RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

संपर्क मो. 8482839451

बुधवार, ३० एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : १२३ | दैनिक | किंमत : ₹५/-
Wednesday, 30 April 2025 | Year : 5 | Issue : 123 | Daily | Rate: Rs. 5/-

## पहलगाम हल्ल्यानंतर काँग्रेसची आक्रमक भूमिका...

**नवी दिल्ली :** आठवडा उलटत आला तरी पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी संघटना आणि पाकिस्तानविरोधात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारने अद्याप स्पष्ट अशी भूमिका घेतलेली नाही. तसेच मुत्सद्देगिरीच्या पातळीवर झालेल्या कारवाया वगळता इतर कारवायांबाबतही निर्णय झालेला नाही. त्यामुळे देशातील मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

गेल्या आठवड्यात जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून 26 पर्यटकांची हत्या केली होती. या घटनेमुळे देशभरात संतापाचे वातावरण आहे. तसेच या हल्ल्यामागे हात असलेल्या पाकिस्तानला कठोर धडा शिकवण्याची मागणी केली जात आहे. मात्र आता आठवडा उलटत आला तरी पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी संघटना आणि पाकिस्तानविरोधात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारने अद्याप स्पष्ट अशी भूमिका घेतलेली नाही. तसेच मुत्सद्देगिरीच्या पातळीवर झालेल्या कारवाया वगळता इतर कारवायांबाबतही निर्णय झालेला नाही. त्यामुळे देशातील मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

काँग्रेसने सोशल मीडिया अकाउंटवर 'गायब' असा एक फोटो टाकत मोदींवर निशाणा साधला होता. त्यानंतर आता पक्षाच्या अधिकृत अकाऊंटवरून काँग्रेसने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर काय काय घडले, असे शीर्षक देत काँग्रेसने चार फोटो शेअर करून मोदींवर टीका केली आहेत. त्यात मोदींकडून प्रधानमंत्रीम्हणून असलेली अपेक्षा आणि त्यांनी घेतलेली भूमिका यांची तुलना




करत टीका करण्यात आली आहे.

यातील पहिल्या फोटोमध्ये मोदींनी पहलगाम हल्ल्यानंतर पीडितांना नुकसान भरपाईची घोषणा करायला हवी होती. मात्र मोदींनी बिहारमध्ये जात निवडणुकीसाठी आश्वासने दिली, असा टोला काँग्रेसने लगाला आहे. तर दुसऱ्या फोटोमधून मोदींनी पहलगाम हल्ल्याबाबत पत्रकार परिषद घेणे अपेक्षित होते, मात्र त्यांनी मन की बात केली, असा आरोप काँग्रेसने केला. पहलगाम हल्ल्यानंतर मोदींनी तातडीने काश्मीरचा दौरा करणं अपेक्षित होते, मात्र त्यांनी निवडणुका असलेल्या बिहारचा दौरा केला, अशी टीका काँग्रेसने तिसऱ्या फोटोमधून केली. तर या हल्ल्यानंतर मोदींनी जखमींची भेट घेणे अपेक्षित होते. मात्र त्यांनी राजकीय भेटीगाठींवर भर दिला, असा टोलाही काँग्रेसने चौथ्या फोटोमधून लगावला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जनता वृत्तपत्राच्या खंडासह 5 खंडाचे प्रकाशन

**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जनता वृत्तपत्राच्या 7, 8 आणि 9 या तीन खंडासह इंग्रजी खंड 4 चा मराठी अनुवाद आणि इंग्रजी खंड 2 च्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालयात झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीतर्फे जनता खंड 7, 8, 9 ची निर्मिती करण्यात आली आहे. कॅबिनेट हॉलमध्ये झालेल्या प्रकाशन कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, सदस्य योगीराज बागुल, ज.वि. पवार, डॉ. संभाजी बिरांजे आदींसह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.




'जनता' हे वृत्तपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली 1930 ते 1956 पर्यंत प्रकाशित झाले होते. 'जनता' हे वृत्तपत्र आंबेडकर चळवळीचा दस्ताऐवज आहे. आतापर्यंत डॉ. आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने जनताचे 6 खंड आणि 1 विशेषांक असे 7 खंड आणि हे 3 खंड असे एकूण 10 खंड प्रकाशित केले आहेत. खंडांमध्ये काय असणार? 'जनता' खंड 7- या खंडात 12 फेब्रुवारी 1938 ते 28 जानेवारी 1939 पर्यंतच्या एकूण 48 अंकाचा समावेश आहे. 'जनता' खंड 8- या खंडात 4 फेब्रुवारी 1939 ते 27 जानेवारी 1940 पर्यंतच्या एकूण 48 अंकाचा समावेश आहे. 'जनता' खंड 9- या खंडात 3 फेब्रुवारी 1940 ते 1 फेब्रुवारी 1941 पर्यंतच्या एकूण 48 अंकाचा समावेश आहे. तर इंग्रजी खंड 4 हा रिडल्स इन हिंदुइझम असून त्याचा मराठी अनुवाद 'हिंदू धर्मातील कुटप्रश्न' या नावाने प्रकाशित झाला आहे.

## गैरमुस्लिमांना काश्मीरमध्ये येऊ देणार नाही हे सांगण्यासाठीच हल्ला : लेफ्टनंट जनरल (निवृत्त) आर.आर. निंभोरकर



**नागपूर :** काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम 370 रद्द केल्यानंतर या प्रदेशात सकारात्मक बदल घडून येत आहेत. परंतु, दहशतवाद्यांच्या ते पचनी पडलेले नाहीत. त्यामुळे त्यांनी गैरमुस्लिमांना काश्मीरमध्ये येऊ देणार नाही हे सांगण्यासाठीच पर्यटकांमधील गैरमुस्लिमांना वेगळे करून ठार मारले, असे निरीक्षण लेफ्टनंट जनरल (निवृत्त) आर.आर. निंभोरकर यांनी सांगितले. निंभोरकर म्हणाले, काश्मीरमध्ये यापूर्वी पर्यटकांमधील गैरमुस्लिमांना मारण्याची घटना घडलेली नाही. अशा घटनांमुळे पर्यटनावर परिणाम होतो. त्यामुळे काश्मीरमध्ये दहशतवाद्यांना सहानुभूती मिळत नाही. परंतु, यावेळी त्यांनी तेच केले. याचे कारण शोधतांना अलीकडच्या तीन घटनांकडे डोळसपणे बघावे लागेल. अमेरिकेचे उपराष्ट्रपती भारत दौऱ्यावर असणे, पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखाने वक्तव्य करणे आणि गैरमुस्लीम पर्यटकांना ठार मारणे या त्या तीन घटना आहेत.



## नागपुरात आज प्रथमच बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना

**नागपूर :** कायदेपंडित बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर 30 एप्रिल 1937 साली नागपूर जिल्हा हायकोर्टमध्ये अचानक का आले होते? त्यावेळी ब्रिटिश शासनाच्या एका कोर्टात स्वातंत्र्यसैनिक संत अंगनदास यांना मोठ्या अपराधी आरोपात फाशीची सजा सुनावण्यात आली होती, त्यावेळच्या मध्यप्रान्त सी. पी. एन्ड बेरार क्षेत्रात कामगार व समाज संघटक म्हणून आपल्या कामातून दुरवर प्रचलित असलेले 'जय भीम' घोषचे जनक कामठीचे 'बाबु हरदास एल.एन.' यांनी ही केस सरळ बॉम्बेला (मुंबईला) ख्यातनाम बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेपर्यंत पोहचवली. या केसचा परिपूर्ण अभ्यास करुन डॉ. बाबासाहेबांनी नागपूर हायकोर्टमध्ये येवून येथील जज पुढे तर्कशुद्ध युक्तिवाद (हेरिन्ग) केला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खुप मोठा चाहता वर्ग मोठ्या संख्येने हायकोर्टमध्ये गर्दी करुन होता. लोकांचा जोश बघुन डॉ. बाबासाहेब बोलले होते, 'हे पहा लोकहो मी इथे कोणतेही समाजकार्य करण्यास आलो नाही, हे सरकारी काम आहे. आपण आलाच आहात तर शांत रहा व कोर्ट कार्यवाही समजुन घ्या!' याच कोर्टात जजसाहेबांना 30 एप्रिल 1937 ला सन्त अंगनदास यांची बॅरिस्टर डॉ. बाबासाहेबांमुळे फाशीच्या सजेतून मुक्तता करावी लागली होती आणि याच दिवशी वेळेचे औचित्य साधुन कामठी शहरात 'श्री टुरिन्ग टाकीज' मध्ये बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकरजी यांच्या एका भव्य नागरी सत्काराचे आयोजन बाबु हरदास यांनी केले होते. असा इतिहास आहे. बरोबर 88 वर्षानंतर या नागपूर शहर सिविल लाइन झेड. पी. ऑफिसच्या अगोदर डावीकडील सुरक्षित स्मारक हेरिटेज बिल्डिंग, हायकोर्ट जुनी बिल्डिंगमध्ये 30 एप्रिल 2025 ला प्रथमच दुपारी 3 वाजता इतिहासाला उजाळ देण्यासाठी एक कटआऊट ठेवुन बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्याचा 'प्रथम वर्ष' विशेष आयोजन सत्यशोधक समाज, मानवाधिकार टिम आणि नागपूर इतिहास संशोधक टिम यांचे वतीने आयोजन केल्या गेले आहे. तसेच सत्यशोधक नागमित्र धर्मेश यांच्या एका पुस्तकाचे या इतिहास विषयावर पुस्तक प्रकाशन करत आहोत. याची सुचना भारत सरकार ऑर्किओलॉजी सर्वे ऑफ इंडिया, हेड डायरेक्टर टी.वी. टॉवर हेड ऑफिस व सदर पोलिस स्टेशन सोबत शेकडो लॉयर व अनेक जजसाहेबांपर्यंत या प्रथम आयोजनाचे रितसर लेटर पोहचविले गेले आहेत. आपण सर्व महिला पुरुष अनेक कार्यकर्ता तसेच इतरांना घेवुन यावे अशी जाहीर विनंती करण्यात येत आहे. मुख्य आयोजक - सत्यशोधक नागमित्र धर्मेश पाटील, संपर्क क्रमांक - 9325146734. (16 अवॉर्ड्स प्राप्त प्राचीन पुरातत्व इतिहास संशोधक, पालि धम्मलिपि रायटर व प्रशिक्षक कार्यकर्ता दीक्षाभूमी नागपूर) आणि विशेष सहकारी अ‍ॅड. शेंडे, अ‍ॅड. गौरखेडे, अ‍ॅड. गजभिये, अ‍ॅड. पाटील, अ‍ॅड. आटे, प्रकाश वानखेडे, भीमराव रामटेके, सुभाष चहान्दे, वासुदेव वानखेडे, पिन्टु शेवाडे, प्रकाश जिचकार, रामदास गजभिये, सुधिर पाटील, बाळू वान्द्रे, बोम्बले साहेब, रामचंद्र झोडापे, सुभाष गायकवाड, शोभा पाटील, राणी रा. मोहोड, डॉ. घोष मॅडम, राहुल बोरकर, सुनिल लांजेवार, सुनिल मेश्राम व ईतर सर्व कार्यकर्ते आहेंत. अशी माहिती मुख्य आयोजक यांनी दिली.





आयु. मनोहर उद्धवराव गजभिये
उप-प्रबंधक
नॅशनल इन्श्योरेन्स क.लि.
मधून दि. 30 एप्रिल 2025 ला 36 वर्षे यशस्वीरित्या सेवा प्रदान करून सेवानिवृत्त होत आहेत.
निवृत्त जीवनाकरिता
अनंत शुभेच्छांसह मंगलकामना!

: शुभेच्छूक :
अंकील गजभिये, स्नेहा - संदेश राऊत
संचालक S&S Study circle आणि
समस्त गजभिये परिवार
NICIANS परीवार
ऑल इंडिया जनरल इन्श्योरेन्स
एससी/एस टी परिषद (जयमुर्ती)
नागपूर युनिट

## दहशतवादी हल्ल्यानंतरही हिंदु-मुस्लीम ऐक्य कायम!

**यवतमाळ :** काश्मीरच्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यास आठवडय़ाचा कालावधी लोटला. या हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये अडकलेल्या यवतमाळातील पर्यटकांना हिंदु-मुस्लीम ऐक्याचा आणि काश्मिरी मुस्लीम कुटुंबाच्या आदरातिथ्याचा सुखद अनुभव आला. यवतमाळच्या वडगाव परिसरात राहणारे नरेंद्र भांडारकर आणि नागपूर येथील त्यांचे व्याही व इतर तीन कुटुंबातील 11 जण काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेले होते. या संदर्भात बोलताना नरेंद्र भांडारकर म्हणाले, '10 दिवस पर्यटन केल्यानंतर 22 एप्रिलला सकाळी आम्ही सर्वजण पहलगाममधील 'मिनी स्वीत्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन भागात पर्यटनासाठी जाणार होतो. मात्र त्याच दिवशी सायंकाळी जम्मूहून नागपूरसाठी परतीची रेल्वे होती. बैसरन भागात फिरायला गेल्यास जम्मूला पोहचणार नाही, असे सांगून वाहनचालकाने आम्हाला



जम्मूकडे निघण्याचा आग्रह धरला. त्यामुळे आम्ही सकाळी 10 वाजता नाराजीनेच जम्मूकडे निघालो. दुपारी दोन वाजताच्या सुमारास बैसरन भागात दहशतवादी हल्ला झाल्याचे कळले आणि अक्षरशः उडालोच. आतापर्यंत चालकावर नाराज असणारे आम्ही सर्वचजण त्याला धन्यवाद देवू लागलो. आता जम्मूला सुखरूप पोहचावे म्हणून देवाचा धावा करू लागलो. मात्र आमच्या वाट्याला भलतेच काही आले.

## नागपूर मेडिकलचा विद्यार्थी डॉ. यश जैन नीट सुपरस्पेशालीटीत देशात पहिला

**नागपूर :** नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) शल्यक्रियाशास्त्र विभागाचा विद्यार्थी डॉ. यश जैन हा नीट सुपरस्पेशालिटी परिक्षेत देशात पहिला आला आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील इतिहासात देशात पहिला येणारा डॉ. यश जैन पहिलाच असल्याचा दावा मेडिकल प्रशासनाने केला आहे. डॉ. यश जैनचे वडिल सुनील यांचे इलेक्ट्रिकलेच दुकान असून आई गृहिनी आहे. डॉ. यशचा लहान भाऊ सीए आहे. डॉ. यशचा जन्म ओरीसातील कांताबांजी या लहानश्या गावात झाला.

विवाह संबंधित

एक पहल (लग्न देखील आणि उद्योग देखील)

परिचय सम्मेलन
तरुण - बौद्ध उद्योजक
तरुणी - उद्योजक / कार्यरत व्यावसायिक,

दिनाक : 9 04 मे 2025,
वेळ : सकाळी 10.00 ते संध्या.6.00
दुपारचे जेवण आणि चहा समाविष्ट आहे.
नोदंनी सुरू आहे.

स्थळ : क्वीन्स कोर्ट हॉल, फॉर्च्यून रीगल बँक्वेट, सीताबर्डी, नागपूर,
नोंदणी सुरू आहे. संपर्क - 9975359670, 9022766347



संत गाडगेबाबा बहुउद्देशीय आश्रम जरूड
बुद्ध विहार समन्वय समिती द्वारा आयोजित
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर
रविवार २५ मई से १ जून, २०२५ आठ दिवसीय निवासी शिबीर
शांतीवन चिंचोली (फेटरी) नागपूर (महाराष्ट्र)
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर (१०० बाल-बालिका, उम्र १३ से १६ साल)
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर (५० भारत के नागरिक, उम्र १८ से ७० साल, अंग्रेजी, हिंदी, मराठी भाषामें
* पालि भाषा प्रशिक्षक *
आचार्य राजेंद्र भालशंकर (नाशिक)
* मुख्य संयोजक *
सतिश गायकवाड / बबिता गायकवाड
८९९९९६०७९३ / ९९७००८३४३७ / ९६६५६१४३४१
* मुख्य आयोजक *
अशोक सरस्वती बौद्ध / प्रा. डॉ. प्रमिला चिंचखेडे
मो. ८५३०९८०७४१ / ८७८८६०७३२३
आपली नाव नोंदणी करा. (निशुल्क)
अपना नाम दर्ज करने की कृपा करे (निशुल्क)

दै. बहुजन सौरभ च्या वाचकांना
११६ व्या
ग्रामजंयती
पर्वाच्या शुभेच्छा!




वैशिष्ट योजना
1 - नियमित सामुदायीक ध्यान, प्रार्थना.
2 - प्रसारक प्रशिक्षण शिबीर व निवास व्यवस्था.
3 - शेतकऱ्योना मार्गदर्शन व निवास व्यवस्था.
4 - रूग्णांसाठी उपचार व निवास व्यवस्था.
5 - बाहेरगावच्या विद्यार्थ्यांनसाठी निवास.
6 - वं महाराजांचे साहित्य निर्मिती व विक्री.
7 - लग्न,धार्मीक कार्यक्रमासाठी सभागृह
8 - अदयावत डीजीटल वाचनालय
9 - उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन.
10 - प्रचारकांसाठी राहण्याची व्यवस्था
सदस्यता,शाखा नोंदणी सुरू आहे.
नोंदणी सदस्यास,शाखेस प्राधान्य व सुट
8484849282,9822265268

रजि.नं. F- 33331 (ना) /15
श्रीगुरूदेव सेवामंडळ सुभाष रोड, नागपूर
कार्यकारिणी
अ‍ॅड.अशोक यावले. अध्यक्ष | सौ.संगिता जावळे. उपाध्यक्ष | श्री.विठ्ठलराव पुनसे. सचिव | श्री.राजेश कुंभलकर. सहसचिव
श्री.सात्विक ठवरे, कोषाध्यक्ष | श्री.सियाराम चावके, प्रचार प्रमुख | प्रा.रामदास टेकाडे, सदस्य | प्रभाताई ठवकर म.सदस्य
राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळ
डॉ.बाळासाहेब पदवाड. अध्यक्ष | श्री.रुपराव वाघ, डॉ.गणेश चव्हाण, श्री.रामराव चोपडे. श्री.सुरेंद्र बुराडे, श्री.बंडोपंत बोढेकर, श्री.दिलीप सुरकार.

“ स्वतंत्रतेची निष्ठा असलेला माणूस सर्वदा सामर्थ्याच्या उंचीवर असतो! ”



# संपादकीय

## पहलगाम हल्ल्यानंतर इंदिरा गांधींचे नाव का पुढे आले?

पहलगाम हल्ल्यानंतर तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि शिवसेना नेते संजय राऊत यांनी इंदिरा गांधींवर केलेल्या वक्तव्यावर सोशल मीडियावर लोकांच्या संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. काही लोक त्यांच्या वक्तव्याचे समर्थन करत आहेत, तर काही लोक त्यांच्या बाजूने नाहीत. रेवंत रेड्डींच्या वक्तव्यावर आयुष मिश्रा नावाच्या एका यूजरने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिले आहे की, ‘संपूर्ण देश एकत्र येताना पाहून अभिमान वाटत आहे.’ पहलगाम हल्ल्याविरोधात हैदराबादमध्ये विरोधी पक्षाच्या नेत्यांनी एक कँडल मार्च काढला होता. कँडल मार्च दरम्यान काँग्रेस नेते आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी म्हणाले, ‘प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांना एक विनंती की, ज्यांनी आमच्या देशवासीयांवर हल्ला केला, त्या दहशतवाद्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी आम्ही सर्व 140 कोटी देशवासी एकजुटीने तयार आहोत.’ रेवंत रेड्डी यांनी म्हटले, ‘1967 मध्ये जेव्हा चीनने आपल्या देशावर हल्ला केला, तेव्हा इंदिराजींनी त्याला चोख प्रत्युत्तर दिले. त्यानंतर 1971 मध्ये जेव्हा पाकिस्तानने देशावर हल्ला केला, तेव्हाहा इंदिराजींनी ठाम उत्तर देत पाकिस्तानचे दोन तुकडे केले. त्यावेळी अटलबिहारी वाजपेयीजींनी इंदिराजींना दुर्गा म्हटले होते.’ ‘आज देशाला इंदिरा गांधींची खूप आठवण येत आहे,’ असे शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर इंदिरा गांधींचा एक फोटो पोस्ट करत लिहिले. कन्हैयालाल शरण नामक एका यूजरने एक्सवर लिहिले आहे की, ‘जर आज इंदिरा गांधी जिवंत असत्या, तर पाकिस्तानने उद्याचा सूर्य पाहिला नसता.’ 1971 मध्ये भारत-पाकिस्तान युद्धानंतर सिमला करार झाला होता. हा एक औपचारिक करार होता, जो दोन्ही देशांमधील शत्रुत्व संपवण्यासाठी महत्त्वाचा मानला जात होता. यासोबतच शांततापूर्ण तोडगा पुढे नेण्यात सिमला कराराचीही विशेष भूमिका असल्याचे मानले जात होते. सिमला करारानुसार, दोन्ही देशांनी मान्य केले की, दोघेही द्विपक्षीय चर्चा आणि शांततापूर्ण मार्गाने सर्व समस्या सोडवतील. खरंतर, जर आपण सिमला कराराची पार्श्वभूमी पाहिली तर हे 1971 मध्ये भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या युद्धाशी संबंधित आहे. 1971 मध्ये भारताने बांगलादेशला (ज्याला त्या वेळी पूर्व पाकिस्तान म्हणून ओळखले जात होते) पाकिस्तानपासून स्वातंत्र्य मिळवून देण्यास मदत केली होती. त्या वेळी सुमारे 90,000 पाकिस्तानी सैनिकांनी आत्मसमर्पण केले होते. 1971 च्या युद्धानंतर भारताच्या तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती झुल्फिकर अली भुट्टो यांच्यात एका करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती. या कराराला सिमला करार म्हणून ओळखले जाते. जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची (सीसीएस) बैठक झाली. भारताने पाकिस्तानबरोबरचा 1960 चा सिंधू जल करार त्वरीत स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर भारताने अटारी इंटिग्रेटेड चेक पोस्टही तात्काळ प्रभावाने बंद करण्याचा निर्णय घेतला. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी म्हटले की, आता पाकिस्तानी नागरिक सार्क व्हिसा सवलत योजनेनुसार (एसव्हीईएस) जारी करण्यात आलेल्या व्हिसाच्या आधारावर भारतात येऊ शकणार नाहीत. एसवीईएसच्या अंतर्गत पाकिस्तानातील नागरिकांना पूर्वी जारी केलेले व्हिसा रद्द मानले जातील. एसवीईएसच्या अंतर्गत जे पाकिस्तानचे नागरिक भारतात आहेत, त्यांना भारत सोडावे लागेल. भारताकडून उचललेल्या पावलांना प्रत्युत्तर देताना पाकिस्तानकडूनही काही पावले उचलली गेली आहेत. पाकिस्तानने भारतासोबतचे द्विपक्षीय करार स्थगित केले आहेत. यामध्ये सिमला कराराचा समावेश आहे. पाकिस्तानने भारतीय विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र आणि सीमा बंद करण्याचा आणि भारतासोबतचा व्यापार स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. ■ ■

बहुजन सौरभ

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### खासदार वेतन वाढ

नुकतीच आपल्या लोकप्रतिनिधी खासदार यांच्या वेतन आणि इतर भत्ते यात वाढ झाल्याची बातमी वाचली आणि दुःख झाले. देशात प्रचंड बेरोजगारी महागाई आणि आर्थिक असमानता आहे. परदेशी कर्जाचा प्रचंड डोंगर वाढत आहे. अर्थव्यवस्था डबघायला आली आहे. रुपयाचे अवमुल्यान सुरु आहे आणि अशा भीषण परिस्थितीमध्ये खासदार लोकांनी आपले वेतन वाढवणे निश्चितच निषेधार्थ आहे. आता सगळ्या राज्यात आमदार पण आपली वेतनवाढ करून घेतील यात शंका नाही. बाकी काहीही असो एकमेकांचे कितीही कट्टर विरोधक असले तरी अशा प्रसंगी सर्व एक होऊन अवघ्या काही मिनिटात याला मंजुरी दिली जाते, याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**दिलीप मून**
वाडी. नागपूर.

# जयंती तर साजरी झाली मूळ समस्यांचे काय ?

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 134 वी जयंती उत्साहात साजरी झाली. डीजे. डेकोरेशन, गीतकार इत्यादीवर लाखो रुपये खर्चही करण्यात आले. मोठ्या प्रमाणावर वर्गणीतून पैसे जमा केले गेले. तेव्हढी ऐपत आहे म्हणून करू शकलो. हेही खरेच! वैचारिक कार्यक्रम सुद्धा झाले. प्रबोधन करण्यासाठी जयंती मंडळानी व्याख्यानमाला आयोजित केल्या. आयोजकांमध्ये उत्सव साजरा करण्याची जिद्द दिसून आली. हे सर्व मानवी स्वभावाला धरून आहे. ज्या महामानवाने मृतप्राय समाजाला आपल्या हक्काची जाणीव करून जिवंत केले तो समाज कृतज्ञता व्यक्त करणारच! परंतु काही गंभीर समस्यासुद्धा पुढे आल्या आहेत. खाजगीकरणामुळे आरक्षण नष्ट होणे हे मोठे संकट पुढे आले आहे. त्याचाही विचार सामूहिकरित्या झाला पाहिजे म्हणून हा लेख लिहत आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती हा दिवस जगभर साजरा होतो. परंतु आंबेडकरी समाजात तो दिवस सणासारखा साजरा केला जातो. या निमित्ताने भारतीय संविधान, संविधानिक मूल्य इत्यादींवर सर्वत्र चर्चा झाली. काही जयंती समित्यांनी विशेषांक प्रकाशित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याचा गौरव करणे गरजेचे आहे. नविन पिढीला हे माहिती झाले पाहिजे. जयंती निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले. स्पर्धा आयोजित केल्या. समता सैनिक दल यांचे अभिवादन आणि पथसंचल कार्यक्रम याने जयंती कार्यक्रमाला अधिक महत्व आले. नाशिकला एक आगळा वेगळा उपक्रम मोहनभाऊ आडांगळे यांनी राबविला. कोट पॅन्ट अर्थात सूट परिधान करून रॅली काढली. त्यांचे म्हणणे आपण सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरां सारखे दर्जेदार पोशाखात राहिले पाहिजे. या उपक्रमाला माझे समर्थन आहे. जयंती निमित्ताने 18 तास अभ्यासाचा उपक्रम राबविण्यात आला. यातून नुकसान काहीच नाही. सामाजिक उत्तरदायित्व किंवा समाजभान निर्माण करण्यासाठी हे उपयुक्त आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर काय म्हणाले यावर दृष्टी टाकू या. 28 सप्टेंबर 1952 ला मुंबईला शेडूल्ड कास्ट फेडरेशन आणि इतर संघटनांनी आयोजित कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‘केवळ माझे नाव घेऊन जयजयकार करण्यापेक्षा जी गोष्ट माझ्या दृष्टीने अत्यंत मोलाची आहे ती करण्यासाठी प्राणाच्या मोलाने तुम्ही झटा.’ समता प्रस्थापित करणे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आत्मसन्मान चळवळीचा उद्देश आहे. त्यासाठी त्यांनी विविध उपदेश केले. शिक्षण घ्या. राजकारण ही मास्टरकिल्ली आहे. बौद्ध धम्माचे आचरण आणि सरकारी नोकरी. सरकारी नोकरी बाबत ते म्हणाले ‘इतरांच्या मनातील विषमतेची भावना नष्ट करण्यासाठी तुम्ही सरकारी नोकरीत गेले पाहिजे. जो समाज सरकारी नोकरी मध्ये असतो त्याची ऊर्जितावस्था होते.’ ते असेही म्हणाले की ब्राम्हणाचे महत्व यासाठी आहे की सरकारी नोकरीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, मोक्याच्या जागा पटकवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या उपदेशानुसार थोडीफार प्रगती होत असताना सरकारी उपक्रमाचे खाजगीकरण करणे सुरू आहे. त्यामुळे आरक्षण नष्ट होत आहे. ते शेवटच्या घटका मोजत आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या उपदेशानुसार सरकारी नोकरीपासून वंचित व्हावे लागत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. वरून अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण आणि क्रिमिलेयर लागू करण्याची मंजुरी सर्वोच्च न्यायालयाने सरकारला दिली आहे. या मुळे आंबेडकरी समूहाची झोप उडायला पाहिजे. शत्रूची चाल ओळखून आपली मोर्चे बांधणी केली पाहिजे. जयंती साजरी करताना या विषयाचे मात्र गांभीर्य दिसले नाही. पुढे काय करायचे? आपली भूमिका काय असेल? या वर चिंतन व्हावे आणि सामूहिक कृतीसुध्दा करावी लागेल. डॉ. बाबासाहेबांचे गुणगान, मनुवाद आणि नेत्यांवर टिका अनेक लोकांना फार आवडते. वक्ता ते ओळखून असतो. टाळ्या मिळवितो. हे सोपे असते. ज्या शिक्षण आणि सरकारी नोकरीमुळे आंबेडकरी समाज पुढे आला त्यावर संकट आले आहे. त्याचे काय? अशा मूळ समस्यांचे काय? सध्याची परिस्थिती पाहता विदेशात नोकऱ्या शोधल्या पाहिजेत. तरच या पुढे प्रगती होईल. त्यासाठी आधी जे लोक तिकडे गेले त्यांनी महत्वाची भूमिका बजावली पाहिजे. काही लोक अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, जपान, नार्वे, दुबई, कॅनडा इत्यादी देशात काम करीत आहेत. त्या देशातील नोकरीचे निकष काय आहेत? हे त्यांनी सांगितले तर येथे तशी तयारी विद्यार्थी करतील. उदाहरणार्थ जापानमध्ये नोकरी करण्यासाठी जापनीज भाषा अवगत असणे गरजेचे आहे. अशा प्रकारे नियोजनबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा. अन्यथा आपल्या देशात सरकारी नोकऱ्या नष्ट केल्या जात आहेत. खाजगीकरण झपाट्याने झाले आणि होत आहे. आता सरकारी नोकरीच्या भरवशावर राहू नये. मात्र शासन प्रशासनात जाण्याचा प्रयत्न सुद्धा सोडू नये. समाजाची देशात प्रतिमा निर्माण करण्याचा तो मार्ग आहे. विद्यार्थी 8 व्या वर्गात असताना पासून विदेशाची तयारी करावी तरच भवितव्य आहे. दुश्मन चाल करून आला आहे. त्याची चाल ओळखून आपली मोर्चे बांधणी केली पाहिजे. शैक्षणिक संस्थेत प्रवेश, शिष्यवृत्ती इत्यादी विद्यार्थ्यांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. अन्याय अत्याचाराचे प्रश्न आहेत. ॲट्रॉसिटी कायदा निष्प्रभ होत आहे. बौद्धांना अनुसूचित जातीचे केंद्र सरकारचे आरक्षण घेण्यासाठी महार लिहावे लागते अशा गंभीर समस्या आहेत. या विषयांवर लिहिणारे व उपाय शोधणारे जयंती विशेषांक हवेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तेच म्हटले, माझा उदो उदो करण्यापेक्षा माझ्यासाठी महत्वाचे जे आहे ते करा. मला वाटते सरकारी नोकऱ्या खाजगीकरण केल्यामुळे गेल्या. थोडेच बाकी आहे, तेव्हा तरुण पिढीला रोजगार कसा मिळेल? त्यांना उद्योग उभा करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन मदत केली पाहिजे. ही चिंता व चिंतन करणे गरजेचे आहे. आता गुणगाण करणे थोडे कमी व्हावे. मर्यादेत व्हावे. कोणत्या बाबींना प्राथमिकता द्यावी हे निश्चित केले पाहिजे. आपल्याकडे विद्वान लोक आहेत. ते समस्या शोधू शकतात. त्यावर उपाय योजू शकतात. सक्रिय लोक त्यावर कार्यरत होऊ शकतात. जयंतीसारखे सामुहीक प्रयत्न व्हावेत. राजकीय सत्ता नाही म्हणून काहीच होणार नाही ही भावना सोडून दिली पाहिजे. सत्ता हवी हे खरे आहे पण तोपर्यंत समस्येने उग्र रूप धारण केले असेल. आता संपूर्ण शक्ती शिक्षण आणि देश विदेशातील नोकऱ्या, उद्योग यासाठी लावणे प्राथमिक गरज आहे. विषमता नष्ट करण्यासाठी समाजाची प्रगती होणे गरजेचे आहे. हे प्रयत्न जयंती जशी समूह भावनेने केली जाते त्याच समूह भावनेने व्हावेत. शत्रू मारा करीत असताना आम्ही आनंद उत्सव साजरा करून संतुष्ट होऊ नये. तर आता जयंती साजरी झाली. आता मूळ समस्यांवर काम करण्याची गरज आहे. ■ ■





**अनिल वैद्य**
माजी न्यायाधिश
9657758555

# लोकगायिका नेहासिंह राठौर सध्या प्रचंड चर्चेत!



स्पष्ट उच्चारण, तीक्ष्ण शब्दफेक, विषयाचा अभ्यास व बिहारी शैली या जोरावर भोजपुरी व्यंगकार नेहासिंह राठौर ही युवती सध्या प्रसिद्धीच्या उच्चांकावर आहे. नुकताच तिच्याविरुद्ध उत्तरप्रदेश राजधानी लखनऊ येथे गुन्हा दाखल झाला.
तिचे व्यंग व कटाक्ष, दोन धर्मियांत तेढ निर्माण करतात असा हजरतगंज पोलिसांचा आरोप आहे. तशी ती मूळ बिहारची आहे. पण माध्यमांनी तिला घराघरात पोहचविले. ती सातत्याने देशप्रमुखांना प्रश्न विचारत असते. त्यात तिचे सातत्य आहे.
28 वर्षाच्या या युवतीने सध्या उत्तर भारतात वैचारिक आग लावली. ती सरळ विचारते, भाजप म्हणजे देश नव्हे. नरेंद्र मोदी देव आहेत काय? मी प्रश्न का विचारु नये? मी प्रश्न विचारु नये म्हणून एफ आय आर दाखल झाले.
पहलगाम हत्याकांडावर प्रश्न विचारला तर इतका गहजब झाला. मी देशद्रोही सांगण्याची मोहिम सुरू झाली. हिला तुरुंगात टाका अशी मागणी होत आहे. अर्थात मी देशद्रोही? प्रश्न विचारण्याने देशद्रोह! माझा भाऊ आज सैन्यात आहे. नात्यागोत्यातील कितीतरी सैन्यात होते, आहेत. प्रत्यक्ष लढतांना बरेच शहीद झाले. विकलेल्या माध्यमांनी व ट्रोलर्सनी मला देशप्रेम शिकवू नये.
तशी ती चर्र धारदार बोलते. संथ, शांत चिरत नेते. आक्रमक न होता देहबोलीची ही शैली क्वचित दिसावी. ती कानपूर विद्यापीठाची बीएससी आहे. वडील आर्किटेक्ट व आई गायिका. 2022 ला चळवळीतील तरुण हिमांशू सिंह याचेशी लग्न झाले. हिमांशू आयएएस कोचिंग सेंटरला शिक्षक आहे.
याआधी नेहाचे ‘का बा’ हे व्यंग खूप गाजले. आधी बिहार मे का बा? नंतर यू पी मे का बा? शेवटी एम पी मे का बा? असे ते चालले. तिचे कवन कापदार असले तरी आवाजातील गोडवा वेगळाच भाव देतो. तिला अभिनयाचे अंग असावे. ती पदर घेऊन असो की ‘बाबकट’ असो, पहावीशी .. ऐकावीशी आहेच! तिचे विचारणे सामान्यांच्या सहज गळी उतरते. ती म्हणते, गरिबीवर विचारणे तुम्हाला झेपत नाही, बेरोजगारी तुमच्या हिशेबात नाही, भ्रष्टाचार म्हटले की नाक मुरडता. मग मी विचारु कशावर? पहलगाम वर विचारले तर देशद्रोही ठरवता? माझी चित्रफित पाकिस्तानी लोकांनी मोबाईलवर दाखवली तर मी काय करणार? म्हणून देशद्रोही? हद झाली ही! अशी ही नेहासिंह राठौर, येत्या बिहार विधानसभा निवडणुकीत महत्वाचा मुद्दा ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. ■ ■



**रणजित मेश्राम**
मो. 9890020789

# आंबेडकरी ऐक्याच्या मार्गातील गतीरोधक



विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूर येथे लाखो अनुयायांना जी धम्मदीक्षा दिली ती खऱ्याअर्थाने जगाच्या पाठीवर इतिहासात सदैव अजरामर राहणारी ‘न भूतो न भविष्यती’ अशी धम्मक्रांती ठरली. तत्कालीन दलित, वंचित, पिडित जे खरे आंबेडकरी अनुयायी बनून डॉ. बाबासाहेबांच्या आवाहनाला प्रतिसाद देत समोर आलेत आणि त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली असली तरी, त्यातून इच्छा असतांनाही दलितांच्याचमधील काही समुह तेव्हा धम्मदीक्षेपासून वंचित राहिला आणि नंतर तो पूर्वी ज्या स्थितीत होता अगदी तसाच आजतागायत राहिला. डॉ. बाबासाहेबांचा इशारा तथा संदेश शिरोधार्य मानून जे पूर्वाश्रमीचे दलित धम्मदीक्षेनंतर बौद्ध बनलेत त्यांनी जुनाट रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धेला झुगारून शिक्षणाला महत्त्व दिले, त्यामुळे आज बौद्ध समाज जो थोडा काही सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक बाबतीत सुधारलेला दिसतो ते धम्मदीक्षेचे खरे फलित आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. हे ही खरे आहे की, धम्मदीक्षेनंतर जलदगतीने आंबेडकरी अनुयायांची सुधारणा झाल्याचे दिसून येत असले तरी, जे सुधारले ते पुढे गेलेत, मात्र त्यांनी मागे राहिलेल्या समाज बांधवांकडे मागे वळून कधी बघितले नाही, त्याचा परिणाम असा झाला की, जे पुढे गेले ते पुढेच जात राहिले आणि जे मागे राहिले ते मागेच राहत गेले, त्यामुळे पुर्वाश्रमीचे दलित आणि धम्मदीक्षेनंतरचे बौद्ध यांच्या मधली वैचारिक, आर्थिक सुधारणेची दरी कमी होण्यापेक्षा ती वाढतच गेली, हे वास्तव कुणीही नाकारू शकत नाही आणि केवळ धम्मदीक्षा घेऊन बौद्ध झाल्यामुळे काहींची प्रगती झाली आहे, असेही ठामपणे सांगता येत नाही. मात्र, डॉ. बाबासाहेबांच्या ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ या आवाहनाला धर्मांतरित बौद्ध बांधवांनी प्रचंड प्रमाणात प्रतिसाद देत, त्या दिशेने वाटचाल सुरू केली व आजही करीत आहेत, त्यामुळेच तो समुह इतर मागासवर्गीयांपेक्षा विकासाचा पल्ला गाठू शकला हे निर्विवाद सत्य कुणी नाकारू शकत नाही. आरक्षणाने संधी मिळाली असली तरी आलेल्या संधीचे सोने करण्याची किमया ही बौद्ध समाजाने केली. त्यासाठी बौद्ध समाजातील मातापित्यांनी आपल्या मुलामुलींना शिक्षण देण्यासाठी अतोनात कष्ट सोसले, प्रसंगी उपाशीपोटी राहून सुद्धा मुलांच्या शिक्षणासाठी पैसा कमी पडू दिला नाही. आरक्षणाने केवळ संधी मिळाली असली तरी रात्रंदिवस अभ्यासाचा ध्यास मनाशी बाळगून आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर बौद्ध समाजाने आपली प्रगती केल्याचे दिसून येते. सर्वच मागासवर्गीयांना आरक्षण असतांनाही आज बौद्ध समाजात सुद्धा गरीबी आहेच, केवळ शहरातील कॉलन्यात, सदनिकेत राहणाऱ्यांवरून संपूर्ण समाजाचे मुल्यमापन होऊ शकत नाही. कारण देशाच्या आणि राज्याच्या ग्रामीण तथा दुर्गम भागात अजूनही शिक्षणाची गंगा पोहचलेली नाही आणि शिक्षणच नसेल तर विकास कसा साधल्या जाईल, हा खरा प्रश्न आहे. म्हणून आरक्षणाचा बागुलबुवा करून आरक्षण विरोधी सातत्याने आरक्षणभोगी समुहात आपसी भांडणे लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. जातीनिहाय वर्गवारी केल्याने आपसुकच तुमच्या हातात नोकरीचा आदेश येणार नसून तेथे सुद्धा शिक्षणातून पात्रता आणि पात्रतेतून कठीण स्पर्धा परीक्षांना सामोरे जात खडतर प्रवासातून मार्गक्रमण करावे लागते. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर श्रम, सातत्य आणि चिकाटी शिवाय काहीही मिळत नाही. म्हणूनच आधीच नोकऱ्या मर्यादित होत असतांना केवळ जाती समुहात वर्गवारी करून सर्वकाही साध्य होईल असे वाटत नाही. कारण यशाच्या दिशेने धावणारे कधी रस्त्यावरील खड्ड्यांचा विचार करीत नाहीत, ते आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पुढेच पाऊल टाकत असतात. एकंदरीत जो मनापासून अभ्यास करतो तो नक्कीच यशस्वी होत असतो. परंतु कॉपी करणारा नापास होताच तो अनेक कारणांची पेरणी करून परीक्षा यंत्रणेचीच बदनामी करीत असतो. असे काहिसे सामाजिक चित्र बघायला मिळत आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आजच्या घडीला बौद्ध समाज इतरांच्या तुलनेत काही प्रमाणात शिकून पुढे आला आणि त्यातून नोकरीवर लागला व आपल्या कर्तृत्वाने आर्थिक संपन्न झाल्याचे दिसून येत असले तरी या सुधारलेल्या समाज बांधवांना संपूर्ण समाज एकत्र यावा असे कधीच वाटू नये ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल. महापुरूषांची जयंती अथवा सामाजिक, सार्वजनिक उत्सव, सोहळे अथवा प्रासंगिक कार्यक्रमात बहुजन समाज फार मोठ्या संख्येने गर्दी करून असतो, मात्र तो राजकीय क्षेत्रात विविध गटातटांत विखुरलेल्या स्वरूपात दिसतो. सर्व जग डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना शिरोधार्य मानत आहे, त्यांनी लिहिलेल्या संविधानाची जगभर ख्याती आहे, भारतात संविधानाने विविध जाती, धर्म, पंथांना एका शृंखलेत आणून येथे लोकशाहीच्या माध्यमातून अठरापगड जाती गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत, इतकी किमया भारतीय संविधानाने केली आहे. डॉ. बाबासाहेबांनी येथील दलित, पिडित, वंचितांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देत त्यांना स्वाभिमानी बाण्याने जगता यावे यासाठी आयुष्य झिजविले आणि पुढे माणूस असूनही त्यांचे माणूसपण नाकारणाऱ्या हिंदू धर्माला फार पूर्वीच इशारा देत सांगितले होते की, जर तुम्ही आम्हाला माणूस म्हणून स्वाभिमानाने जगू देत नसाल तर आम्हाला हिंदु धर्माची फारकत घेऊन स्वतंत्र धर्म घ्यावा लागेल. परंतु दुर्दैवाने काही कालावधी लोटून सुद्धा अपेक्षित निर्णय होत नसल्याचे दिसून न आल्याने शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमीवर लाखों अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा देऊन हिंदू धर्माचा त्याग केला. डॉ. बाबासाहेबांच्या कुटूंबियांची जन्मभूमी महाराष्ट्र आणि डॉ. बाबासाहेबांची जन्मभूमी म. प्रदेशातील महू असले तरी त्यांची कर्मभूमी महाराष्ट्र, भारत आणि संपूर्ण देशविदेशात त्यांच्या कार्याने जगप्रसिद्ध झाले आहेत ते म्हणजेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. या उद्धारकर्त्या महामानवाचे अनुयायी इतर राज्यांच्या तुलनेत आपल्या महाराष्ट्रात अधिक आहेत. त्यामुळे सर्व गटतट एकत्र आल्यास महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या राजकारणात एक प्रभावी पक्ष म्हणून एकिकृत, एकसंघ आंबेडकरी राजकीय पक्ष दबावगट निर्माण करू शकतो याची जाणीव विविध आंबेडकरी राजकीय पक्षांपेक्षा सत्ताधारी तसेच विरोधी पक्ष असलेल्यांना आहेच. त्यामुळेच त्यांना एकत्रित होऊ न देता कायम विभक्त ठेवण्याचे कटकारस्थान सातत्याने सुरू असते, त्याचाच एक भाग म्हणून आंबेडकरी समाजाच्या काही लाचार म्होरक्यांना तुकडा टाकून आपल्या दावणीला बांधून ठेवल्या जाते हे अनेकदा आंबेडकरी समाजाने अनुभवले आहे व सध्याही अनुभवत आहे. दुर्दैव असे की, वरच्या फळीतील नेत्यांप्रमाणेच खालच्या फळीतील नेत्यांनी सुद्धा आपापल्या सिमारेषा ठरवून विस्तिर्ण अशा जमिनीचे तुकडे करून मधातच धुरे निर्माण केले आहे. प्रत्येकजण स्वतःला नेता, गटप्रमुख समजतात. ते सर्वांसोबत जयभीम करतात. परंतु पक्ष मात्र त्यांचा वेगळा असतो. डॉ. बाबासाहेबांची विचारधारा सर्वांनाच मान्य, परंतु सारे गट एकत्र येणे कुणालाच मान्य नसल्याचे दिसून येते. प्रत्येकांना आत्मप्रौढीने पछाडले आहे, एकाच वेळेस सर्वांना नेतृत्व हवे आहे, कुणी माघार घ्यायला तयार नाही. कुणीही ‘मी’ पणा सोडून ‘आम्ही’ म्हणण्यास तयार नाहीत. अशा स्थितीत अपेक्षित एकसंघ आंबेडकरी राजकीय पक्षाची नौका संथ, सक्षम अशा राजकीय पक्ष किनाऱ्याच्या शोधात घिरट्या घालत आहे. या विस्कळीत झालेल्या नौकेला वाचवायचे असल्यास विविध गटातटाच्या नेत्यांनी आत्मप्रौढीने पछाडलेल्या आपल्या मानसिकतेला आंबेडकरी समाजाच्या हितासाठी तथा भविष्यातील आव्हाने पेलून पुढील वाटचाल सुकर करण्यासाठी लगाम घालण्याची गरज आहे. कारण आंबेडकरी समाजाच्या ऐक्यासाठी नेत्यांची आत्मप्रौढी मानसिकताच ऐक्यातील गतीरोधक बनून पुढे येत आहे. येवढे मात्र निश्चित! ■ ■



**रतन तायडे**
मो. 9420125761

# मानव कल्याणासाठी बसवेश्वर महाराजांच्या कार्याचे अनुकरण आवश्यक

बसवेश्वर महाराजांना कोणत्याही प्रकारचा लोभ नसल्यामुळे न्याय प्रीय राजा होते. बसवेश्वर महाराज हे बसव, बसवण्णा इत्यादी नावाने ओळखले जात असले तरीही थोर समाजसुधारक म्हणून त्यांची मोठी ख्याती होती. त्यामुळे त्यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे व गरजेचे आहे. इ.स.1105 ते 1165या कालखंडात होऊन गेलेले कर्नाटकातील संत व समाजसुधारक होते. त्यांनी नेहमी निर्गुण व निराकार एकेश्वरवाद श्रध्देचा पुरस्कार केला. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात 1105 साली वीरशैव कुटुंबात बसवेश्वर महाराजांचा जन्म झाला. मुख्यत्वेकरून त्यांचा जन्म अक्षतृतीयेला झाला. अक्षतृतीया हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक व महत्वाचा दिवस मानल्या जातो. त्यामुळे या दिवसाला शुभ मानण्यात येते. बसवेश्वर महाराज कर्मठ विधीचा विरोध करायचे अशा परिस्थितीत मुंजीचा विरोध करून मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे असे सांगत वयाच्या 8 व्या वर्षी घर सोडून ते कुडलसंगम येथे निघून गेले. कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी 12 वर्षे वास्तव्य केले. कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा प्रगल्भ अभ्यास केला. त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला व त्यानंतर सोलापूरातील मंगळवेढा येथे आले. बसवेश्वरांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद स्थापन केली. या संसद मंडपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करायची यावर चर्चा करून व योग्य निर्णय घेवून पुढील कार्य होत असे. बसवेश्वर यांचे एकच उद्दिष्ट होते ते म्हणजे समाजातील वाईट चालीरितीचा विरोध करून समाजाच्या हिताच्या गोष्टींची अंमलबजावणी करण्याकडे जास्त महत्त्व देत असे. 12 व्या शतकातील आदर्श, समतेचे, जनकल्याणाकारी प्रणेते म्हणून बसवेश्वर महाराज ओळखले जायचे. त्यामुळेच 12 व्या शतकापासून खऱ्या अर्थाने लोकशाहीला सुरूवात झाल्याचे सांगण्यात येते. कारण लोकशाहीमध्ये समता, मुल्य, न्याय, बंधूंता, एकात्मता, संपूर्ण स्वतंत्र, अधिकार, नियम, नियंत्रण, शिस्त, सूशासन व योग्य प्रशासन यामुळे समाज व देश घडण्यास मोठी मदत मिळते. बसवेश्वर महाराजांच्या संसदेत जातीभेला बीलकुलच थारा नव्हता. त्यामुळे त्यांना समाजाला एकत्र बांधण्यास मोठी मदत मिळाली. कारण कोणत्याही प्रकारचा भेदभाव ते कदापि सहन करत नसे. आपल्याला 21 व्या शतकात जे कायदे दिसतात त्यात बसवेश्वर महाराजांचा सिंहांचा वाटा आहे. बसवेश्वर महाराजांना साक्षात नंदीचा अवतार मानल्या जाते. आपण ज्याला शंकरजीच वाहन म्हणतो. भगवान शंभर या पृथ्वीचा, मानव, पशुपक्षी व जीवजंतू यांचा पालनहार आहे. त्यांच्या सोबत नंदी म्हणजे साक्षात परमेश्वर बसवेश्वर महाराज म्हणजे ही दैवी लीलाच म्हणावी लागेल. कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगमावर असलेल्या गुरूकुलात ज्ञानी गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले. विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला. त्यामुळेच त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्वे कन्नडमधुन लिहिली. बसवेश्वर महाराजांनी नेहमी आध्यात्मिक जीवन व समाज घडवीण्याच्या चालीरीतीचे मार्गदर्शन नेहमीच करीत असे. कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात आपल्याला लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झाल्याचे दिसून येते. सत्ता वैभव आणि कीर्ती याला यत्किंचितही वाव न देता आध्यात्मिक व नितिमुल्याला प्रथम प्राधान्य देवून समाज हितासाठी अहोरात्र प्रयत्न केले. बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीयांना शुद्र, बहिष्कृत समजले जायचे. त्यांना स्त्रीयांवर होत असलेला अत्याचार सहन झाला नाही. याकरीता त्यांनी या विरूद्ध मोठा लढा उभारून मोठे भरीव कार्य केल्याचे दिसून येते. तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने 12 व्या शतकात घडला. त्यामुळे बसवेश्वर महाराजांचे प्रत्येक कार्य व त्यांची जीवनशैली आज समाजाला प्रेरणादायी ठरू शकते व ठरत आहे. आज देशातील राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे आदर्श सामोरे ठेऊन समाज हितांचे व देश हिताचे कार्य करण्याची नितांत गरज आहे. राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे अनुकरण करून भ्रष्टाचार व वाजवीपेक्षा जास्त असलेली चल-अचल संपत्तीचा त्याग करून सरकारी तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे व महात्मा बसवेश्वरांचे आदर्श सामोरे ठेऊन समाजकार्य केले तरच खऱ्या अर्थाने राजकीय पुढाऱ्यांमार्फत बसवेश्वर महाराजांची जयंती साजरी झाली असे गृहीत धरले जाईल. कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ समाजसेवक, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी अशी मोठी जबाबदारीची आणि नामांकित पदे आहेत. त्याचा उपयोग समाज घडविण्यासाठी व्हायलाच हवा. बसवेश्वर महाराजांजवळ कोणतेही पद नसताना समाज हितासाठी अहोरात्र कार्य केले. कारण ते त्यागी, निष्ठावान, महान समाजसेवक व समाजसुधारक होते. त्यांचे अनुकरण करून आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची नितांत गरज आहे. वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षय्य तृतीया यांच दिवशी महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच दिवशी पराक्रमी भगवान परशुराम यांचाही जन्म झाला हा एक संयोगच म्हणावा लागेल. अक्षय्य तृतीया या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून, महात्मा बसवेश्वर आणि भगवान परशुराम यांच्या जयंतीचे शुभ संकेत लक्षात घेता या भारत भुमित आजच्या दिवशी प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन आगळावेगळा ऐतिहासिक उपक्रम राबवुन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प संपूर्ण मानवजातीने करायला हवा. कारण मानवजातीच्या कल्याणासाठी आज तीन दैवी शक्ती एकत्र विराजमान आहेत. त्यामुळे तीन दैवी शक्तीचा (अक्षय्य तृतीया, बसवेश्वर जयंती, परशुराम जयंती) संयोग दिवस 30 एप्रिलला उजाडला आहे. यामुळे प्रत्येकांनी वृक्षारोपण करून मानवजातीचा धर्म पाळला पाहिजे. यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व मानवजातीचे कल्याण होईल, गुरांना मोठ्या प्रमाणात चारा मिळेल, पशुपक्ष्यांना शुद्ध हवा व सावली मिळेल. यातच आपल्याला अक्षय्य तृतीया, महात्मा बसवेश्वर, भगवान परशुराम यांचे दर्शन घडुन येईल यात दुमत नाही. कारण संपूर्ण वृक्षांच्या जळा-मूळात, फळात, फुलात, पानात व झाडांच्या कणाकणात आपल्याला थोरमहात्म्यांचा, साधुसंतांचा व बसवेश्वर महाराजासह संपूर्ण देवी-देवतांचा वास अवश्य दिसून येईल. ■ ■





**रमेश लांजेवार**
मो.- 9921690779

# सामाजिक बंधुत्वाचे पुरस्कर्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज!

*जगात खूप मोठमोठे ज्ञानी, विचारवंत, वैज्ञानिक निर्माण झाले, पण भारत हा जगात एक असा देश आहे. की वैज्ञानिक व विचारवंतांच्या रुपात अध्यात्म आणि विज्ञान सांगणारे संत महात्मे जन्माला आले. हि विश्वनिर्मात्याची किमयाच!*

आमच्या देशासारखे संत महात्मे जगात कुठेही झाले नसतील व नाहीत आणि त्यांच्या सारखे तत्वज्ञान कुठेही सांगितले गेले नाही. एवढे थोर संत महात्मे आमच्या देशात झाले आणि त्यांनी लोकांचे अज्ञान दूर करण्यासाठी अध्यात्मातुन वैज्ञानिक विचार भारतीय समाजात पेरला. जेणेकरुन लोकांना अध्यात्मासोबत वैज्ञानिक विचार समजावा आणि त्यांचे अज्ञान दुर व्हावे. त्यातीलच एक संत म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. तुकडोजी महाराजांचा जन्म 30 एप्रिल 1909 मध्ये अमरावती जिल्ह्यातील यावली या गावी झाला. त्यांनी सामाजिक व बंधूभावाच्या रुपाने राष्ट्रीय एकात्मता कशी जोपासली जाईल हा विचार आपल्या प्रबोधनातून सांगितला. गावा गावाशी जागवा! भेदभाव हा समुळ मिटवा! उजळवा हा ग्रामोन्नत्तीचा दिवा! तुकड्या म्हणे!

आपल्या भजन, किर्तन आणि प्रबोधनाच्या माध्यमातून गाव खेड्यातील लोकांना जागृत करण्याचे आणि आपल्या जीवन चारित्र्यातून सामाजिक सुधारणा बंधूंभाव राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभक्तीच्या मुल्यांचा संदेश दिला. ‘गाव हा विश्वाचा नकाशा, गावावरुन देशाची परिक्षा, गावची भंगता अवदसा, येईल देशा!‘ देशाचा मुळ पाया, विश्वाचा घटक गाव आहे. चांगल्या गोष्टीची सुरवात खेड्यातुन झाल्याशिवाय ती बाकीकडे होणार नाही हे त्यांनी ओळखले आणि म्हणून त्यांनी गाव सुधारण्याचा व गाव विकासाचा मूलमंत्र ग्रामगितेतून दिला. अज्ञान अंधश्रध्दा निर्मुलन व जातीभेदाच्या निर्मुलनासाठी त्यांनी भजनाचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आणि ग्रामविकास व देश विकासाचे विचार ग्रामगीता या काव्यातून मांडले. मराठी आणि हिंदी भाषा मध्ये त्यांनी काव्यरचना केली. त्यांची मराठीतील एक काव्यरचना फार प्रसिद्ध आहे. भारतभर फिरल्यावर त्यांना बंधूभाव कुठेही आढळला नाही. म्हणून त्यांनी विश्व निर्मात्याकडे वर मागीतला. ‘या भारतात बंधूभाव नित्य वसूदे! दे वरची असा दे! हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे! मतभेद नसू दे! दे वरची असा दे!’ ‘नांदोत सुखे गरीब, अमीर एकमतानी! मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी! स्वातंत्र्य सुखा या सकलामाजी वसू दे! दे वरची असा दे!’

‘सकळास कळो मानवता, राष्ट्रभावना! हो सर्व स्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना! उद्योगी तरुण वीर शीलवान दिसू दे! दे वरची असा दे!’ ‘हा जातीभाव विसरुनीया एक हो आम्ही! अस्पृश्यता समुळ नष्ट हो जगातुनी! खळनिंदका मनीही सत्य न्याय वसू दे! दे वरची असा दे!’ ‘सौंदर्य रमो घराघरात स्वर्गीयापरी! हि नष्ट होऊ दे विपत्ति भीती बोहरी! तुकड्यादास सदासर्वदा सेवेत कसू दे! दे वरची असा दे!’ सर्व देशाचा विचार व अभ्यास करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी खूपच अर्क भरलेल्या प्रभावी, मुद्देसुद समजेल अशा भाषेत अशा शब्दाचा वापर करून देशहिताच्या दृष्टीने ही सुंदर अशी काव्यरचना केली. जेणेकरून लोकांना समजेल आणि लोक ते आचरणात आणतील. भारतात बंधूंभाव नांदावा सर्व पंथ संप्रदाय यांचे ऐक्य घडून यावे, समन्वय घडून यावा, परस्परात कोणत्याही प्रकारचे मतभेद शिल्लक राहू नये, धर्मभेद ही नसावा, तसाच श्रीमंत आणि गरीब भेदभाव नसावा, अस्पृश्यता तर कुठेही नसावी, जातीभेदाला मूठमाती द्यावी, सर्वांना मानवधर्म कळावा, सगळ्यांनी शीलवान, सदाचारणी व्हावे, अशी विश्वनिर्मात्याकडे त्यांनी प्रार्थना केली. पण दुर्दैवाने असे घडले नाही. आम्ही एक दुसऱ्याच्या द्वेष आणि तिरस्कार करण्यातच गुरफटून गेलो. पर्यायाने देशात बंधूभावाचे वातावरण निर्माण होण्याऐवजी तणावाचेच वातावरण निर्माण झालेले पाहायला मिळते. अशी परिस्थिती आहे. तुकडोजी महाराज एकदा जपानला गेले होते आणि जेव्हा ते तेथून परत भारतात आले. तेव्हा त्यांना भारतातील एका पत्रकाराने प्रश्न विचारला, की तुम्ही जापानला गेले होते. त्याठिकाणी तुम्हाला काय दिसले? तेव्हा तुकडोजी महाराज म्हणाले, मी जपानमधल्या लहान मुलांपासून तर तिथल्या राष्ट्रपतीपर्यंत एकच प्रश्न विचारला! प्रश्न होता, तुम्ही कोण आहा? तेव्हा तुकडोजी महाराज म्हणाले जे उत्तर तिथल्या राष्ट्रपतीने दिले. तेच उत्तर तिथल्या लहान मुलांनी दिले. उत्तर होते ‘मी जापानी आहे.’ पण तुकडोजी महाराज म्हणत हाच प्रश्न जर आपल्या देशात विचारला तर, कोणी म्हणेल मी हिंदू आहे. कोणी म्हणेल मी मुस्लिम आहे. कोणी म्हणेल मी ख्रिश्चन आहे. कोणी म्हणेल मी बौद्ध आहे. येथे भारतीय म्हणायला कोणीही तयार नाही. हा अनुभव प्रत्यक्ष तुकडोजी महाराजांना आला. म्हणून त्यांनी सरळ विश्व निर्मात्याकडेच वरील वर मागितला. तुकडोजी महाराज म्हणतात, मेरा नाम है तुकड्यादास! हमेशा छोटे बडे तुकडो को जोडजोडकर पुरा बनाने की कोशिश मे ही रहता हू! और हर चीज से अच्छा निकालने की आशा मे उत्साहपूर्वक प्रयत्न करते जाता हू! मै सबका हू! सबके लिए हू!





विनोद सरदार
मो.9689847115

तुकडोजी महाराजांचा हा विचार प्रत्येक माणसाने अंगीकारण्याची गरज आहे. हा विचार जेव्हा आम्ही अंगीकारु तेव्हा निश्चितच आमच्या मनातील एक दुसऱ्या विषयीचा वैरभाव, द्वेष आणि तिरस्कार नाहीसा होऊन बंधूभाव निर्माण होईल. यात शंकाच नाही आणि याच दृष्टीकोनातून तुकडोजी महाराजांच्या मनात ग्रामगीता लिहण्याची प्रेरणा जागृत झाली. ग्रामगीतेत काय नाही? तर ग्रामगीतेत सगळेच काही आहे. फक्त आम्हाला ती वाचून आचरणात आणायची गरज आहे. तुकडोजी महाराज ग्रामगितेतून संदेश देतात. ‘मार्गीचे काटे उचलावे! दुःखीताशी पाणी पाजावे! हे धर्म श्रेष्ठ! तिर्थस्थानाहुनी!’ ग्रामीण भागात अज्ञानामुळे एक दुसऱ्याच्या कामात अडथळे या गोष्टी खूप चालतात. कोणाच्या मार्गात अडथळे निर्माण करु नये असे तुकडोजी महाराज सांगतात. दुःखी कष्टी लोकांना मदत करावी तोच खरा मानव धर्म आहे. ‘ग्रामातील सर्वजन! होवोत सर्व सुखी संपन्न! घेऊ नये कुणाचा प्राण! समाजस्थिति टिकावी!’

‘ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण! उद्याचे राष्ट्र आजचे संतान! यासाठी आदर्श पाहिजे गुरुजन! राष्ट्र निर्माते!’ गाव विकासाचा पाया शिक्षण आहे. म्हणून उद्याचे गाव व राष्ट्र हे सुजलाम सुफलाम घडवायचे असेल तर मुलांना चांगल्या प्रकारे शिक्षण द्या. त्यांना उच्च शिक्षित करा, त्यांना चुकीच्या गोष्टीकडे न वळू देता, त्यांना चांगले घडवा कारण तुकडोजी महाराज म्हणतात, उद्याचे राष्ट्रनिर्माते तेच आहेत. ‘सुंदर असावे वाचनालय! नाना ग्रंथ ज्ञानमय! करावया सुबुद्धीचा उदय! गाव लोकी!’ जीवनात वाचन अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणुन प्रत्येक व्यक्तीने वाचनाची गोडी निर्माण करावी. कारण वाचनाने ज्ञान वाढते. माणुस विवेकी होतो. शहाणा होतो. त्याच्या अंगी सहनशीलता येते आणि गाव पण वादविवादापासुन मुक्त होते. एवढी वाचनात म्हणजे ज्ञानात पावर आहे. म्हणुन तुकडोजी महाराज म्हणतात, प्रत्येक गावात वाचनालय असावे, जेणेकरून गावातील कोणी वाममार्गाला लागणार नाही. आपले गाव चांगले होईल. संतांची म्हण आहे. ‘जे-जे आपणासी ठावे ते-ते इतरांना शिकवावे! शहाणे करुन सोडावे सकलजण!’ पण आता मात्र उलटे झाले. ‘जे-जे आपणासी हवे ते इतरांकडून हिसकावून घ्यावे! नंगे करुन सोडावे इतरजण!’ अशी परिस्थिती झाली आहे. यामध्ये सुधारणा घडवून आणणे फार गरजेचे आहे. प्रत्येकाने विवेकी व विचारी होणे गरजेचे आहे व स्वतः मध्ये चांगली सुधारणा घडवून आणणे गरजेचे आहे. असे थोर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला, विनोबा भावेच्या भुदान चळवळीत भाग घेतला. अशा या थोर राष्ट्रसंतांच्या जयंती निमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा. त्यांच्या या जयंती दिनी त्यांचे विचार आपण अंगीकारले हि अपेक्षा! ■■

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

## लॉकर

तो हिऱ्यांच्या कारखान्यात एक मजूर म्हणून रूजू झाला. कालांतराने तो हिऱ्यांच्या व्यापारातील सर्वात मोठा कारखानदार म्हणून नावारूपाला आला. लाखों कोटींचा मालक म्हणून तो कुतूहलाचा अन् चर्चेचा विषय ठरला होता. हिऱ्यांच्या क्षेत्रावर पीएचडी करीत असलेला एक तरूण या हिरेव्यापाऱ्याकडे आला अन् म्हणाला, ‘साहेब! आपण एक सर्वसामान्य मजुर म्हणून या क्षेत्रात पदार्पण केले. पण आज आपण या क्षेत्रातील अनभिषिक्त सम्राट आहात. भल्याभल्यांना जे जमले नाही, ते आपण कसे काय साध्य केले? त्यावर ते म्हणाले, ‘माझ्यासोबत ये!’ ते त्या तरूणाला घेऊन एका लॉकररूममध्ये गेले. त्यांनी एका लॉकरचा दरवाजा उघडला. तो तरूण बघतो तर काय सोने, चांदी, हिरे, माणकांनी ते लॉकर खचाखच भरलेले होते. त्यांनी त्या तरूणाला एक भलीमोठी बॅग दिली अन् म्हणाले, ‘या लॉकरमधील तुला जे काही हवे ते तू खुशाल घेऊन जा! माझ्याकडून तुला हे बक्षीस आहे असे समज.’ त्यावर तो तरूण म्हणाला, ‘साहेब मला यातील काहीही नको. मला फक्त आपण हे यश कसे काय मिळवले याची माहिती हवी आहे.’ त्यावर ते व्यापारी पुन्हा म्हणाले, ‘मी तुझी थट्टा करीत नाही. मी तुला गांभीर्याने अन् मनापासून सांगतोय तुला हवे ते माझ्यातर्फे तू घेऊन जा.’ त्यावर तो तरूण म्हणाला, ‘साहेब! आपण मला जी माहिती हवी आहे, ती न देता आपण हे काय करीत आहात?’ त्या व्यापाऱ्याने लॉकरचा दरवाजा बंद केला अन् ते दोघे बाहेर आले तेव्हा ते व्यापारी म्हणाले, ‘मी येथवर कसा पोहोचलो हे मी तुला माझ्या कृतीतून दाखवले, पण माझ्या तरूण मित्रा! मी दिलेले तुझ्या प्रश्नाचे उत्तर तुला समजू शकले नाही. मी हे यश केवळ यामुळेच मिळवू शकलो की, मी मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने केले. स्वतः चालून आलेल्या संधीला वेळीच ओळखता यायला हवे. एकदा मिळालेली संधी पुन्हा मिळेलच याची काहीही खात्री नसते. योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता आपल्यात हवी. तुझ्यासारखी चूक मी माझ्या आयुष्यात कधीही केली नाही, आता तुझेच उदाहरण घे! मी तुला हवे ते घे म्हणून म्हणालो, तू जर ते घेतले असते तर, तुझ्याजवळही आज कोट्यावधी रुपयांची संपत्ती विनासयास आली होती. पण ती संधी तू सोडली. संधीचे लॉकर क्वचित उघडते. त्यातील खजिन्याला सोडण्याचा मुर्खपणा मी कधीही केला नाही.’ ■■

# साईनाथच्या माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळा 2025



**श्री साई एज्युकेशन सोसायटी अंतर्गत साईनाथ प्राथमिक शाळा, हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मिलनाचे प्रथमच आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सर्वप्रथम माजी विद्यार्थ्यांचे वेलकम ड्रिंक देऊन स्वागत झाले. कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन ड्रमवाद्यांच्या गजरात कार्यक्रमस्थळी आगमन करण्यात आले.**

सर्व माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विचारपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव डॉ. ज्ञानेश्वर पोहाणे, कार्यक्रमाचे अतिथी संस्थेचे सहसचिव परीक्षित पोहाणे, विशेष उपस्थित संस्थेच्या अध्यक्षा नलिनी पोहाणे, ज्ञानेश्वर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओम प्रकाश भेंडारकर, ज्युनिअर कॉलेज व हायस्कूलच्या प्राचार्य रजनी मानकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मनीषा गावंडे व ज्युनियर कॉलेजच्या इन्चार्ज प्रा. विशाखा कांबळे उपस्थित होते. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीताने स्वागत केले. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेकडून सन्मानचिन्ह देऊन विशेष स्वागत करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याने तीन ते चार मिनिटे आपल्या भावनासुद्धा व्यक्त केल्या. यात अमोल इखार, किशोर शिंदे, पूजा आवळेकर, आशिष धुर्वे, ममता डंबारे, शुभम वानखेडे, अभिषेक मेहर, केतकी भजभुजे, तेजस्विनी खडतकर, पूजा पिंगळे, स्नेहल रामटेके, योगिता राजकुमार, धर्मेंद्र बिसेन, अमर चौधरी, अतुल सुरजसे, शलाका खोब्रागडे, प्रतिभा रामटेके, बादल कठाणे, मनोज टेटवार, अक्षय रंगारी, अमृता वैद्य, विक्की शंभरकर, विक्रम तुपे, वैशाली हटवार अशा अनेक वेगवेगळ्या शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

आपल्या मनोगतातून व्यक्त होत असताना किशोर शिंदे म्हणाला सावरण्याचे, जगायचे व उभे राहण्याचे खरे बळ आमच्या साईनाथ कॉलेज मधून मिळाले. 11 वी 12 वी हे दोन वर्ष शिकताना वेगवेगळ्या विषयातून जीवनाला वेगवेगळा आयाम मिळत गेला. आशिष धुर्वे म्हणाला; आपल्या खऱ्या जीवनाची सुरुवात शाळेतून होत असते. त्यातूनच आपले भविष्य घडत असते. खरी माया, प्रेम हे मराठी शाळेत व मराठी टीचरकडून मिळत असते. मोबाईलवर आजची पिढी जास्त आढळते. त्यामुळे 90टक्के मोबाईल त्यांच्या माइंडवर हावी होताना दिसतो. याकडे आजच्या विद्यार्थ्यांनी लक्ष देऊन शिक्षकांप्रती आपली श्रद्धा जागृत ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ममता डंबारे ही विद्यार्थिनी म्हणाली, मी साईनाथ कॉलेजमध्ये 11 वी आर्ट्समधे प्रवेश घेऊन प्रथम आली. येथील प्राध्यापकांच्या विचारांनी घडत गेली. आजच्या परिस्थितीत मी जे मेरिट आहे, या मेरिटची सुरुवात नव्हे तर मेरिटचा बेसच या कॉलेजमध्ये तयार झाला. तेजस्विनी खडतकर आपल्या भावना व्यक्त करताना आर्टचे महत्व समजावून देत म्हणते, पालक वर्ग हा केवळ विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी व टक्केवारी कडेच लागतात. पण विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणाकडे शिक्षकांबरोबर पालकांनीसुद्धा लक्ष देणे महत्त्वाचे आहे. यासाठी शिक्षकांनी त्या पालकांना कन्व्हेन्स करावे; कारण आर्ट्स विभागातून सुद्धा स्वतःचे करिअर घडवता येते. पूजा पिंगळे ही विद्यार्थिनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणते, शाळा म्हणजे अध्यापन व शिक्षकांचे संघटन असते. या संघटनानेच विद्यार्थी घडतात. येथील शिक्षकांच्या प्रेमाच्या छत्रछायेखाली मी घडले. योगिता राजकुमार म्हणते, दर आठवड्यात होणाऱ्या कार्यक्रमामुळे माझा आत्मविश्वास वाढला. आपण कोणत्या शाखेत ॲडमिशन घेतली हा महत्त्वाचा भाग नाही; तर त्यात आपण कसे सहभागी होतो हा महत्त्वाचा भाग आहे असे म्हणत ती आजच्या विद्यार्थ्यांना संबोधित करते. धर्मेंद्र भिसे म्हणतो, आपली संगत ही चांगल्या व्यक्तींची असली पाहिजे. या शाळेमध्ये ही संगत आपल्याला चांगली लाभत असते. अमर चौधरी म्हणतो, विविध कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना जोतिराव, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहू महाराज यासारखे अनेक थोर पुरुष परिचित होतात. त्यामुळे विद्यार्थी विचारशील व्हायला लागतात. प्रतिभा रामटेके ही विद्यार्थिनी ‘आपल्या सावलीतून आपणच शिकावे, कधी लहान तर कधी मोठे होऊन जगावे! शेवटी काय घेऊन जाणार आहोत सोबत, म्हणून प्रत्येक नात्याला हृदयातून जपावे ॥’

अशा काव्यमय पंक्तीतून शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या नात्यांची वीण बांधत भावना व्यक्त करते. मनोज टेटवार नावाचा विद्यार्थी सांगतो, माझे संपूर्ण एज्युकेशन मराठी मिडीयममधून झाले. पुढे पॉलिटेक्निक झाले. आयटीपासून माझा प्रवास सायबर क्राईमपर्यंत झालाय. मराठी मिडीयम स्टेट बोर्डातून ही विद्यार्थी चांगले घडतात हे सगळ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. माझा पाया मराठी माध्यमातूनच झालेला आहे. विक्रम तुपे नावाचा विद्यार्थी सांगतो, पैसा तर कमवा पण समाजाचेही ऋण फेडा. आपल्या समाजात जे दुर्बल घटक आहेत त्यांना थोडे सपोर्ट करा. त्यातून त्यांचे भविष्य घडू शकते. सध्या मी याच भावनेतून आमच्या विहारांमध्ये अभ्यासिकेची सुरुवात केली आहे. त्यातून कितीतरी विद्यार्थी स्पर्धा परीक्षेतून नोकरीवर लागले. ही भावना मी माझ्या कॉलेज जीवनातून निर्माण झालेली. संधी मिळताच त्या भावनेशी मी कटिबद्ध झालो.

वैशाली हटवार आता सध्या ती नागपुरातील एका ज्युनिअर कॉलेजला प्राचार्य पदावर आहे. ती आपल्या भावना व्यक्त करताना म्हणते, शालेय जीवनात जेवढे शिक्षण घेता येईल तेवढे शिकले पाहिजे. शालेय जीवनातच खऱ्या अर्थाने आपल्या जीवनाची पायाभरणी होत असते. कवी कुसुमाग्रजांच्या ओळीतून ती म्हणते. ओळखले का सर मला?

पैसा नको सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा...

शिक्षकांबाबत या भावना व्यक्त करत ते आजही शिक्षकांना आशिर्वाद मागते. अमोल इखार यांनी आपल्या भावना व्यक्त करत असताना शाळेच्या ऋणातून थोडे मुक्त होण्याचा प्रयत्न करत साईनाथ शाळेचे दरवर्षी गरीब वीस विद्यार्थी दत्तक घेऊन त्यांना शालेय पुस्तक देण्याचा निर्णय जाहीर केला. अश्या पद्धतीने सर्वच विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या.

साई शिक्षण संस्थेचे सह सचिव परीक्षित पोहाणे यांनी आपल्या अतिथी स्थानावरून आजी विद्यार्थ्यांना आव्हान केले की तुम्हाला कोणतीही गरज वाटल्यास ती पुरवण्यास आमची संस्था तयार आहे. फक्त मेहनत करायची तुम्ही तयारी ठेवा. आम्ही आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना मदत केली. आमची संस्था सदैव तुमच्या पाठीशी असेल. कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे सचिव डॉ. पोहणे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की या ठिकाणी जे विद्यार्थी घडले ते साई संकुलाच्या परिसरात रमलेल्या व घडलेल्या शिक्षकांकडून; त्यामुळे शालेय परिसर व वातावरण सुद्धा विद्यार्थी घडवण्यास पूरक असायला पाहिजे. असे पूरक वातावरण आम्ही आमच्या परिसरात देतो, त्यामुळेच आपण विविध क्षेत्रात भरारी घेऊ शकलात.

एकंदरीत हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत आनंददायी पण तेवढाच भावनाप्रधान होता. कार्यक्रमाचे संचालन भाग्यश्री नाईक तर आभार प्रदर्शन नितीन कोठेकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचा शेवट विद्यार्थ्यांना स्वरूची भोजन देऊन करण्यात आला. ■■

# तळेगाव दाभाडे येथे वर्धापनदिनात म. जोतिराव फुल्यांच्या विजय असो!




विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या वर्धापन दिनानिमित्त करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने ‘बापाचा बंगला’ न्हाऊन निघालाय. खुप मोठा जनसमुदाय उपस्थित होता. सोपस्कार उरकून वक्त्यांची भाषणे चालू असतात. एवढ्यात ‘महात्मा जोतिराव फुलेंचा विजय असो’ अशा घोषण ऐकु येऊ लागतात. सगळे लोक आवाजाच्या दिशेने बघु लागतात आणि जे बघतात ते पाहुन मंत्रमुग्ध होऊन नकळतपणे जागेवर उठून उभे राहतात. कारण बापाच्या बंगल्यातून साक्षात ‘महात्मा ज्योतिराव फुले’ येतात. डोक्यावर पगडी, अंगात अंगरखा, त्यावर कोट, धोतर, खांद्यावर उपरणे, पायात बुट घातलेल्या महात्मा ज्योतिराव फुल्यांचे दर्शन उपस्थित जनसमुदायाला घडत. टाळ्यांचा कडकडाट आणि ‘महात्मा जोतिराव फुलेंचा विजय असो’ अशा घोषणेने वातावरण दुमदुमून जाते. बंगल्याबाहेर दुतर्फा उभे असलेले लोक त्यांच्यावर पुष्पवृष्टी करतात. तिचा स्वीकार करत ते पुढे चालत येतात. स्मारक समितीच्या वतीने त्यांचा सत्कार केला जातो. त्याचा स्वीकार करत ते व्यासपीठावर येतात. उपस्थित जनसमुदायावर नजर फिरवतात आणि बोलायला सुरुवात करतात. आपल्या अमोघ वाणीने उपस्थित प्रेक्षकांना पावणे दोनशे वर्षापूर्वीच्या पुण्यात घेऊन जातात. तेव्हाच समाज मन, जाती व्यवस्था, त्यातला फोलपना, स्त्रियांची दयनीय स्थिती याच्यावर जोरदार हल्ला चढवतात. विधवा स्त्रियांची बाळंतपण, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांना किती दिव्यातून जावे लागले हे सांगताना उपस्थित गहिवरतात हे सगळे घडत असते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तळेगाव दाभाडे येथील निवासस्थानावर. अतिशय संघर्ष करून याच तारखेला (26.4.2012) तेरा वर्षांपूर्वी स्मारक समितीला बापाच्या वास्तूचा ताबा मिळाला होता. तेव्हापासून दरवर्षी हा ऐतिहासिक दिवस स्मारक समिती ‘वर्धापन दिन’ म्हणुन मोठ्या दिमाखात साजरा करते. याहीवर्षी अतिशय जोशात साजरा झाला.

कार्यक्रमाची सुरुवातिला मान्यवर मिलिंद पानपाटील (Level 14) आणि संचालक केंद्रीय जल आयोग, जलशक्ती मंत्रालय भारत सरकार, दिल्ली), यशवंत माणखेडकर (संचालक, नेहरू युवा केंद्र पुणे, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार) व मिलिंद येहळेगांवकर (डेप्युटी सेक्रेटरी, LIC) यांनी डॉ. बाबासाहेब व माता रमाई यांच्या पुतळ्यांना हार घातले व दीपदान केले. या नंतर अमित भोसले यांच्या बाल चमूने बुद्धवंदना सादर केली. याच चमूने प्रथम नमो गौतमा व एक मैत्री गीत अतिशय सुरेल स्वरात सादर केले. स्मारक समितीचे सचिव किसन थूल सर यांनी प्रास्ताविक भाषण केले. बंगला ताब्यात घेण्यासाठी केलेला संघर्ष त्यांनी थोडक्यात सांगितला. तसेच, स्मारक समिती राबवत असलेल्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. तद्नंतर स्मारक समितीच्या वतीने मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. मान्यवरांनी मार्गदर्शन करताना स्मारक समितीच्या कामाचे कौतुक केले व समितीला बंगल्याच्या बाजूला असलेली जमीन खरेदी करण्यासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. यशवंत माणखेडकर यांनी त्यांच्या तर्फे एक लाख रुपये देणार असल्याची घोषणा केली. या दरम्यान भीम जयंती निमित्त राबविण्यात आलेल्या अठरा तास अभ्यास या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच बंगल्यावर अभ्यास करून सरकारी सेवेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार देखील करण्यात आला. धम्म बंधु रुपेश घोडेस्वार यांचा यावेळी विशेष सन्मान या वेळी करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात स्मारक समितीच्या अध्यक्षा ॲड. रंजना भोसले यांनी देखील मान्यवर व उपस्थितांना बंगल्याच्या बाजूला असलेली जमीन खरेदी करण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले. आजच्या कार्यक्रमाला अण्णा बनसोडे उपसभापती, विधानसभा महाराष्ट्र हे देखील उपस्थित राहिले होते. त्यांनी स्मारक समितीचे कौतुक केले व समितीला मदत करण्याचे आश्वासन दिले. आजच्या कार्यक्रमाच्या आकर्षणाचा बिंदू ठरले ‘मी फुले बोलतोय’ हा नाट्यकर्मी कुमार आहेर यांचा एकपात्री प्रयोग. महात्मा फुल्यांचे विचार आजच्या काळानुरूप श्रोत्यांना पटेल अशा पद्धतीने त्यांनी मांडले. व्यवस्थेला दोष देत असताना आपणही कसे बदलायला पाहिजे हे त्यांनी दाखवले. अतिशय नर्म विनोदी परंतु तितकाच मार्मिक अशा पद्धतीने त्यांनी प्रयोग सादर केला. या एकपात्री प्रयोगाने प्रेक्षकांची मने जिंकली. प्रयोगानंतर उपस्थितांनी भोजनाचा आस्वाद घेतला व कार्यक्रमाची तारीफ करून रजा घेतली. नेहमीच्या परंपरेत साजेल याच पद्धतीने वर्धापन दिन सोहळा संपन्न झाला. स्मारक समिती टीमचे कौतुक. ■■

संवाद मित्र : किरण शिंदे

# जेष्ठांसाठी विश्वासाचे, सुरक्षित ठिकाण

***डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंती निमित्ताने, वाढदिवसाच्या आणि आनंद उत्सवाने अनेकांनी मधुरांगण वयोवृद्ध डिमेंशिया केअर सेंटरमध्ये सदिच्छा भेट दिली. आयोजकांनी वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम आयोजित करून जेष्ठांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक स्थितीनुसार सहकार्य करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. कारण मधुरांगण वयोवृद्ध डिमेंशिया केअर सेंटर हे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकारद्वारा मान्यताप्राप्त असून तेथील कर्मचारी शासनातर्फे प्रशिक्षित आणि चांगली देखरेख करण्यास सक्षम आहेत. त्यामुळे जेष्ठासाठी विश्वासाचे आणि सुरक्षित ठिकाण म्हणजे मधुरांगण होय.***

याप्रसंगी प्रवीण कुंटे परिवाराने जेष्ठांना भोजनदान आणि पुरुष लाभार्थ्यांना टी शर्ट व महिला लाभार्थ्यांना गाऊन देण्यात आले. हलबा समाज मंडळद्वारे दुसऱ्या दिवसाचे भोजनदान करून सदिच्छा भेट दिली आणि जेष्ठांचे मनोबल वाढवून श्री. कुहीकर यांनी उन्हाच्या बचावासाठी कुलर दान देण्याचे आश्वसन दिले. विनायक म्युझिकल ग्रूप आणि त्यांच्या चमूद्वारे संगीताचा कार्यक्रम आयोजित करून जेष्ठांना जुने गीत गाऊन आनंदमय करून खूप मोठ्या प्रमाणात कार्यक्रम करण्यात आले. संस्थेचे आयोजक श्री. मुळे सर आणि सौ. जोशी मॅडम यांच्या चमूने प्रत्येकी दोन हजार रुपयाचे दान देऊन वृद्धाश्रमाचे आवश्यक कार्यात हातभार लावला. तरुण वर्गात साहिल मेश्राम यांनी आपला वाढदिवस जेष्ठांसोबत करून अनोखी भेट आणि आनंदी आनंद करून समाधान व्यक्त केले. तर अमेरिकेवरून बरखा मिलर यांनी त्यांच्या आईचा वाढदिवस साजरा करून मिठाई देऊन जन्मोत्सव साजरा केला. या प्रसंगी त्यांनी मधुरांगणला थंड आणि गरम पाण्याचे प्युरिफायर देऊन जन्मोत्सव साजरा केला आणि भविष्यात कोणतीही गरज पडल्यास सर्वतोपरी मदतसाठी आश्वासित केले. तसेच योगेश लोखंडे मित्र परिवाराने त्याच्या वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त फळ वाटप करून आणि जेष्ठांना लोअर टी शर्ट तर महिलांना गाऊन भेट देऊन कार्यक्रम केला. महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय उमरेड येथील विद्यार्थ्यांनी अभ्यासदौरा करून ज्येष्ठांसोबत खेळ आणि इतर ॲक्टिव्हिटी करून अभ्यासदौरा पूर्ण केला. या प्रसंगी डॉ. जांभुळकर, डॉ. इंगोले आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. जेष्ठ पत्रकार आणि श्रमजीवी ग्रामीण पत्रकार संघाचे महेश ठाकूर यांनी जेष्ठांना स्वसेवेने बनवून स्वरूची भोजन देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.




मधुरांगणचे अध्यक्ष डॉ. विनोद गजघाटे यांनी प्रत्येक वृद्धाला हक्काने प्रेम, मानसन्मान आणि सुरक्षितता मिळायला हवी आणि अशा वेळेस त्याच्या गरजा समजून घेणारी आणि त्याच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारी संस्था म्हणजे मधुरांगण केअर सेंटर होय. या प्रसंगी सामाजिक दायित्व पूर्ण करण्यासाठी समाज बांधवाचे तसेच दानदात्याचे सहकार्याशिवाय शक्य नाही. कारण वरून झाडे सारखे व्यतिमत्व मागील चार महिन्यापासून मधुरांगणला लागणारा किराणा सामान दान करून आमचा आत्मविश्वास वाढविण्यास मदत करतात, असे मनोगत डॉ. विनोद गजघाटे आणि त्याच्या चमूने सर्व दानदात्याचे मनःपूर्वक धन्यवाद करून आभार मानून अश्याच सहकार्यासाठी आवाहन केले.

जेष्ठांप्रति त्यांना सुद्धा जगण्याचा अधिकार आहे. त्यामुळे त्यांना देखील जगण्याचा सन्मान, आनंद आणि सुरक्षितता मिळण्यासाठी मधुरांगण केअर सेंटरची भूमिका महत्वाची आहे. जेष्ठ नागरिकांची स्वभावातील बदल आणि त्यांची काळजी यावर मार्गदर्शन केले. या प्रसंगी श्री. प्रवीण कुंटे, हलबा समाज मंडळाचे श्री. वैद्य साहेब, सोरटे साहेब, संथपक सचिन कुहीकर साहेब, विनायक मुसिकचे श्री. मुळे आणि सौ. जोशी तसेच अमेरिकेच्या बरखा मिलर आणि योगेश लोखंडे तर डॉ. जांभुळकर, डॉ. इंगोले व विद्यार्थी इत्यादींनी केक कापून मधुरांगणच्या कर्मचारी पूनम ब्राम्हणकर, सुषमा धुर्वे, डॉ. ज्योती गजभिये यांनी स्वागत केले आणि साहिल मेश्राम यांनी आभार मानले. या प्रसंगी मोठ्या संख्येने सामाजिक बांधिलकीला जपणारे व्यक्तिमत्व उपस्थित होते. ■■

# राष्ट्राची एकमयता व समतावादी दृष्टिकोन

त्यामुळे राजकीय समतेला आरंभ झाला आहे. त्यातून सामान्यांच्या आकांक्षा पल्लवीत होतील. आकांक्षाचे पूर्णत्व झाले नाही, तर वर्णसंघर्ष आणि वर्गयुद्ध अटळ होणार आहेत. वर्गसंघर्ष आणि वर्ण संघर्ष टाळावे लागतील. त्यासाठी आपल्या जीवनातील राजकीय सामाजिक आणि आर्थिक विषमता संपवावी लागेल. हे संपवले नाही तर एकूणच व्यवस्थेला धोका निर्माण होईल. असा इशारा देताना डॉ. आंबेडकर म्हणतात, ‘राजकारणात समता आणि सामाजिक, आर्थिक, राजकारणात विषमता, हे विसंगत चित्र संपवावे लागेल. प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य हे तत्व आपण राजकारणात स्वीकारणार आहोत. आर्थिक, सामाजिक संरचनेत माणसाला समान मूल्य नाकारणे, हे भविष्यात चालणार नाही. अशी विषमता राहिली तर या संविधान सभेने परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाही संरचना उद्ध्वस्त होईल. त्यामुळे राजकीय लोकशाहीतून सामाजिक, आर्थिक समता असलेली लोकशाही निर्माण करावी लागेल. समतेशिवाय असणाऱ्या लोकशाही स्वातंत्र्याला अर्थ नाही. सामाजिक पातळीवर समता आणि भारतीयांमधील बंधुता वाढीस लावण्याची जबाबदारी आपण स्वीकारली पाहिजे. हे कठीण तत्व असले तरी भारतीय जीवनाला एकता आणि एकजीनशीपण आणण्यासाठी आवश्यक आहे. हे आजही समजून घेण्याची निकड लक्षात घेतली पाहिजे.’ (संविधान सभेतील भाषण (25 नोव्हेंबर 2025) परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की, आजही ते आपण समजून घेण्यास तयार नाही. आजची परिस्थिती टाळायची असेल तर ‘आम्ही भारतीय’ ही संकल्पना कृतीने स्वीकारून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता ही मूल्ये आपल्या जीवनात अंगीकारणे आवश्यक आहे. महात्मा फुले यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, ‘सर्वांचा निर्मिक एक आहे जाण!! पाळणपोषण!! तोच करी!! स्त्रीपुरुष हक्क सर्वा कळवावे!! सत्यानें बोधावे!! मानवांस!! देशधर्मभेद नसावा अंतरी!! भावंडांचे परी!! धरी सर्वां!! असे बा शिक्षक सर्व ठाई नेमा!! आधी सत्यनमा !! ज्योती म्हणे!!’ उपरोक्त विचारांवर गांभीर्याने चिंतन करणे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. पहा शक्य आहे का? जय संविधान!! जय भारत!!

प्रदीप सुमन ग. शेंडे,
मो. 8806566968

**तळटीप :** ही सर्व भूमिका समजून घेण्यासाठी आणि महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या दांपत्याने शोषणवादी व्यवस्थेतून समस्त समाजाला बाहेर काढण्यासाठी आयुष्य खर्ची घातले आहे. त्या ऋणातून उतराई होण्याकरिता आपल्या शहरातील जवळच्या सिनेमागृहात लागलेला ‘फुले’ हा चित्रपट जरूर पाहावा ही आग्रहाची विनंती. सदर चित्रपट शुक्रवार दि. 25 एप्रिल 2025 पासून प्रदर्शित झाला आहे. ■■

# भूसंपादनावरून गडचिरोलीतील शेतकऱ्यांमध्ये खदखद...

**गडचिरोली :** लोह खनिजावर आधारित उद्योगांमुळे जिल्ह्याची ओळख बदलत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत आहे. विमानतळ उभारण्यात येणार आहे. परंतु यासाठी जर आमची सुपीक शेतजमीन सरकार घेणार असेल तर आम्ही कुठे जायचे, असा प्रश्न चामोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा उपस्थित केला आहे. या परिसरात 'एमआयडीसी'करिता प्रशासन मोठ्या प्रमाणात भूसंपादन करणार आहे. त्यासंदर्भातील प्रक्रिया देखील सुरु करण्यात आल्याने बारमाही शेती करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये असंतोष पाहायला मिळत आहे. एकेकाळी दुर्गम आणि नक्षलग्रस्त अशी ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात लोह खनिजांच्या साठ्यामुळे मोठमोठे उद्यागपती लाखो कोटींची गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. त्यामुळे जिल्ह्यात लोहखनिजावर आधारित उद्योग निर्मितीला वेग आला आहे. त्या पार्श्वभूमीवर चामोर्शी तालुक्यातील कोनसरीलगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तब्बल 963 हेक्टर जागेची



मागणी केली आहे. यासाठी प्रशासनाने परिसरातील मुधोलीचक 2, जयरामपूर, पारडीदेव, सोमनपल्ली, कोनसरी, मुधोली तुकुम या ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांना भूसंपादनासाठी नोटीस पाठवली आहे. यातील काहींच्या जमिनी थेट खरेदी करण्याची प्रक्रिया देखील सुरु आहे. भेंडाळा परिसरातील जवळपास पंधरा गावातील शेत जमीन सुद्धा अधिग्रहित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. मात्र, शेजारी बारमाही वाहणाऱ्या नदीमुळे जिल्ह्यात सर्वाधिक सुपीक शेत जमीन या भागात आहे. त्यामुळे शेतजमीन देण्यास येथील शेतकरी तयार नाही. याविरोधात एकत्र येत शेतकऱ्यांनी दोनवेळा मोठे आंदोलन केले. गावात जमीन मोजणीसाठी आलेल्या महसुलच्या अधिकाऱ्यांना हाकलून लावले. प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता थेट जमीन अधिग्रहण करण्यासाठी नोटीस पाठविल्याने शेतकऱ्यांनी आक्षेप नोंदवला आहे. जयरामपूर, मुधोलीचक क्रमांक 2 गावात तर जमिनीच्या संदर्भात कुणीही येऊ नये असे फलक लावण्यात आले होते. सुपीक जमिनीवर विमानतळ विकसित करण्यासाठी भूसंपादनाकरिता शेतजमिनी देण्यास ग्रामसभेने विरोध दर्शविला असून याबाबतचा ठराव नुकताच ठराव घेण्यात आला होता. त्यानंतरही प्रशासनाने थेट जमिनी खरेदी करण्याचे पत्र काढले आहे. याविरोधात मूरखळा येथे शरद ब्राह्मणवाडे यांनी उपोषण देखील सुरू केले आहे. सूरजागड टेकडीवर उत्खनन करणाऱ्या लॉयड मेटल्स कंपनीचा कारखाना कोनसरी येथे उभा उभारण्यात येत आहे. खासगी भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांमध्ये रोष आहे. एवढेच गरजेचे असेल तर शासनाने कायद्यात बदल करून वनजमिन उद्योगांसाठी द्यावी असेही त्यांचे म्हणणे आहे

## बौद्धगया येथे नागपूर ते बुद्ध गया स्पेशल ट्रेन (अधिकची) मागणी




**नागपूर :** बुद्ध पौर्णिमेनिमित्य अधिकची नागपूर ते बुद्धगया स्पेशल ट्रेन सुरू करावी अशी मागणी करिता दि. 22/04/2025 ला सिनीअर डिसीएम अमन मित्तल यांना सर्व संघटनांनी भेट दिली. चर्चेत असे ठरविण्यात आले की हा मुद्दा रेल्वे डीएमआर, तसेच रेल्वे येथील रेल्वेचे जी.एम. यांच्या अंतर्गत येतो. तेव्हा संघटनेनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेट देण्याचे ठरविले. मुख्य रेल प्रबंधक, सेंट्रल रेल्व यांनी विविध संघटनेच्या माध्यमातून निवेदन देऊन मागणी करण्यात आली. नागपूरवरून बुद्धगयेला जाण्यासाठी एकच ट्रेन दीक्षाभूमी एक्स्प्रेस असते. ही आठवड्यातून एकदा असल्यामुळे देशामध्ये उष्णतेची लाट मोठ्यार प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे अनुयायांना एकच ट्रेन असल्यामुळे बराच हाल अपेष्टा सहन कराव्या लागतात. या माध्यमातून आम्ही रेल्वे विभागाला विनंती केली की, रेल्वे विभागांनी अधिकची स्पेशल ट्रेन नागपूर ते बुद्धगया तसेच बुद्धगया ते नागपूर अधिकची स्पेशल ट्रेन चालविण्यात यावी. विदर्भातून 5000 ते 7000 बौद्ध अनुयायी बुद्धगया येथे जाणार आहेत. अशी सामाजिक बौद्ध समाजातील संघटना, आंबेडकरी चळवळीतील संघटना, समता सैनिक दल, यांनी याप्रसंगी अधिकची स्पेशल ट्रेन चालविण्यात यावी अशी मागणी केली. या प्रसंगी भदंत हर्षदिप, राहुल मुन, मच्छिंद्र सावळे, राज सुखदेवे, डॉ. कांबळे, रामदास गजभिये, विश्वासभाऊ पाटील, मनिष शंभरकर, सचिन रामटेके, राजू बेलेकर, गणवीर तसेच अन्य सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व संघअनेनी एकमेव ठराव घेतला की, काही कारणास्तव स्पेशल ट्रेन सुरू झाली नाही तर आपण पी.आय.एल. मुंबई हायकोर्ट नागपूर बेंच येथे दाखल करू.




## सिद्धार्थ बुद्ध विहार

गिट्टीखदान ले-आउट, राणा प्रताप नगर, नागपूर-4400 22, सिद्धार्थ बुद्ध विहार हे सिद्धार्थ विकास मंडळाद्वारे संचालित केले जाते. बुद्ध विहार परिसर अत्यंत निसर्गरम्य आहे. या विहारात सर्व बहुजन महापुरूषांच्या जयंती रमाई व भिमाई यांची जयंती, भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून 10 दिवसीय शिबिरे सुद्धा इथे दरवर्षी संपन्न होतात. भीम गीत व बुद्ध गीतावर आधारित ऑर्केस्ट्रा इथे विशेषत्वाने आयोजित केल्या जातो. दरवर्षी वर्षावासाचा कार्यक्रम सुद्धा येथे आयोजित केल्या जातो. विविध विषयांवर व्याख्याने व प्रवचन इथे होत असतात.

संवाद मित्र, सी. एन. शेंडे
मो.9325636298

## महत्वाचे

### सामूहिक बुद्ध पौर्णिमा समारोह 2025 आयोजन सभा गुरुवारी




**नागपूर :** सामूहिक बुद्ध पौर्णिमा समारोह 2025 चे आयोजन करावयाचे आहे. त्या निमित्ताने सभेचे आयोजन दि. 01/05/2025 (गुरुवार)दुपारी 4.30 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन (कॉन्फरन्स हॉल), उरूवेला कॉलनी, नागपूर या सभेला मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे. या कार्यक्रमाला आयोजक डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियर्स (बानाई), आणि नागपूरमधील सर्व सामाजिक संघटना आहेत.

### ज्येष्ठांकरिता नि:शुल्क योग शिबीर 1 मे पासून



**नागपूर :** ज्येष्ठ नागरिक मंडळ दत्तात्रय नगर तथा पतंजली योग समिती रघुजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी 7 दिवसीय नि:शुल्क योग प्राणायामाचे आयोजन पंडित दीनदयाल उपाध्याय गार्डन रघुजी नगर येथे करण्यात आले आहे. शिबिर एक ते सात मे दरम्यान सकाळी 5.30 ते 7 वाजेपर्यंत घेण्यात येईल. शिबिरात 7 ही दिवस तज्ञ योग मार्ग मार्गदर्शक योग प्राणायाम व्यतिरिक्त जेष्ठांसाठी आदर्श दिनचर्या, आहार विहार, विचार आणि उर्वरित जीवन आनंदी राहून कसे जगावे यासंबंधी मार्गदर्शन करण्यात येईल. तज्ञ मार्गदर्शकांमध्ये इंजिनीयर संजय खोंडे, जिल्हा प्रभारी डॉ. जिवेश पंचभाई, महिला प्रभारी उर्मिला जुवारकर आणि राजेंद्र जुवारकर, निसर्गोपचार तज्ञ डॉ. धनराज शेंद्रे, योग विस्तारीका माधुरी ठाकरे, माधुरी निंबुलकर, माजी मंडळ प्रभारी हंसराज मिश्रा व आंतरराष्ट्रीय योग ट्रेनर डॉ. भरत गुप्ता यांचा समावेश आहे. प्रकल्प निदेशक नामदेव फटिंग( मो.8275297400) यांनी या संधीच्या ज्येष्ठ नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन एका पत्रकाद्वारे केले आहे.

### तथागत बुद्ध जयंतीचा कार्यक्रम संदर्भात आज बैठक




**नागपूर :** बानाई हॉल येथे अरुण गाडे यांच्या अध्यक्षतेखाली व भन्ते प्रियदर्शी आणि विविध संघटनाचे प्रतिनिधी यांचे उपस्थित झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार तथागत बुद्ध जयंतीचा कार्यक्रम भगवान नगर ग्राउंड येथे दिनांक 13.5.2025 ला घेण्याचे ठरले. यासंदर्भात कामाचा आढावा घेण्यासाठी तसेच कार्यक्रमसाठी आर्थिक नियोजन बाबत सर्व बुद्ध विहार समिती, विविध सामाजिक व धम्म संघटना प्रतिनिधीची बैठक आयोजित आहे. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विभागातील बौद्ध युवक युवतीचा सहभाग असावा याकरिता भन्ते-प्रियदर्शी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार 30/4/2025 सायं. 4.00 वाजता कल्पतरू बुद्ध विहार, कैलास नगर येथे बैठक आयोजित आहे.

## नग्न पुजेचा महाराष्ट्र अंनिस तर्फे तीव्र निषेध

**नागपूर :** नुकतेच पैशाच्या पाऊस पडण्याच्या हेतूने तीन अल्पवयीन मुलींची नग्न पूजा करण्याची घटना घडली. हे अत्यंत दुर्दैव असून या घटनेचा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे निषेध करण्यात येत असून योग्य चौकशी करून त्या तीन अल्पमुलींना तात्काळ संरक्षण व सहकार्य मिळवून देण्याबरोबरचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अनुप खांडे यांना शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर प्रणित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर जिल्ह्याच्या वतीने जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे तथा कोराडी शाखा अध्यक्ष ताराचंद पखीडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट घेऊन शासनास निवेदन देण्यात आले.

पुरोगामी महाराष्ट्रातील उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात अंधश्रद्धेमुळे 'पैशाचा पाऊस पाडण्याच्या नावाखाली मध्यरात्री नग्न पूजा, तीन अल्पवयीन मुलीवर अत्याचार' घडल्याची घटना अत्यंत गृहस्पद आहे. त्याचा गुन्हा मानकापूर पोलीस स्टेशन नागपूर येथे दाखल झाला असून



त्याचा तपास तेथील पोलीस अधिकारी करीत आहेत. 21 व्या शतकात अंधश्रद्धेमुळे घडलेली घटना ही अत्यंत निंदनीय, दुर्दैवी आहे. त्यामुळे या घटनेचा शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर प्रणित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे. करिता शासनास नम्रपणे निवेदन देण्यात आले निवेदनामध्ये (1) अन्यायग्रस्त, शोषित असलेल्या तीन नाबालिक मुलींना शासनाने तत्काळ संरक्षण देऊन योग्य सहकार्य करावे. (2)अशा घटना यापूर्वी घडून आणल्या का याबाबत कसून चौकशी करण्याचे आदेश पोलिसांना द्यावे. (3)समाजात अंधश्रद्धेमुळे अश्या घटनाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी जादूटोणाविरोधी कायदा प्रसार आणि प्रसार अंमलबजावणी कायक्रमांतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्याचे आदेश पोलीस विभाग, समाज कल्याण विभाग, शिक्षण विभाग, बालकल्याण विभाग, यांना तात्काळ देण्यात यावे. अशी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर प्रणित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा कार्यकारणीची मागणी केली आहे. या घटनेचा राज्य सरचिटणीस संजय शेंडे, जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग, जिल्हा उपाध्यक्ष मधुकर धंदरे, अशोक खोरगडे, सेवकराम राऊत, विनोद उलीपवार, मनीष अडागळे, डॉ. कविता मते, संजय बलमे, विजय मोकाशी, मालती वराडे, अशोक पाटील, शरद वानखेडे, रवींद्र राऊत आदी जिल्हा पदाधिकाऱ्यांनी निषेध नोंदविला.

## विदर्भाचे काश्मीर माहित आहे काय?



**नागपूर :** विदर्भाचे काश्मीर म्हणून ओळखले जाणारे अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा सध्या वाढत्या तापमानामुळे चर्चेत आले आहे. चिखलदरा (अमरावती) विदर्भातील थंड हवेचे ठिकाण अशी ओळख आहे. चिखलदरा या पर्यटनस्थळाला यावर्षी उन्हाचा फटका बसला आहे. चिखलदराचा पारा हा 38 अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले आहे. त्यामुळे हिल स्टेशनऐवजी हे हॉटेस्ट डेस्टिनेशन ठरत आहे. याचा फटका स्थानिक हॉटेल व्यावसायिकांना बसला आहे. विदर्भाचे नंदनवन समजले जाणारे चिखलदरा शहर राज्यातील महत्त्वाच्या पर्यटनस्थळांपैकी एक आहे. दरवर्षी राज्यभरातून दीड लाखांवर पर्यटक भेट देतात. जून महिन्यात पावसाळा सुरू झाला की, हजारो पर्यटकांचा ओढा याठिकाणी असतो. मात्र, यावर्षी उन्हाळ्यात चिखलदऱ्याच्या तापमानात वाढ झाली. सध्या पारा हा 38 अंश पर्यटनस्थळावरील रस्त्यांवर शुकशुकाट असून, एकही पर्यटक दिसून येत नाही. विदर्भात सध्या पारा 44 अंश सेल्सियस पर्यंत गेला आहे. चिखलदरा शहरात मोठ्या प्रमाणात कॉंक्रिटीकरण सुरू आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली आहे. यामुळे तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

## दक्षिण नागपूर शिवसेना शिंदे गटाचे OCW च्या विरोधात मडका फोडो आंदोलन




**नागपूर :** दक्षिण नागपूर शिवसेना शिंदे गटाच्या वत्तीने हनुमान नगर झोन क्र. 3 येथे oc2 विरोधात मटका फोड आंदोलन विदर्भ संपर्कप्रमुख किरण पांडव संपर्क प्रमुख मनोहर चंद्रिकापुरे जिल्हाप्रमुख सुरज गोजे, समीर शिंदे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. दक्षिण नागपुरातील प्रभाग 29 व 34 या भागातल्या न्यू म्हाळगी नगर, धनकवडी नगर, महालक्ष्मी नगर, प्रेरणा नगर, विनायक नगर, शिवाजी सोसायटी, गजानन नगर, प्रोसेस सोसायटी या भागात अत्यंत कमी दाबाने व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने आज प्रभागातील जनतेचा आक्रोश अनावर झाला असून स्थानिक जनतेच्या मागणीवरून विधानसभा संघटक विशाल कोरके यांच्या नेतृत्वात विशाल मोर्चा हनुमान नगर झोन येथे नेण्यात आला. स्थानिक त्रस्त महिलांनी व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांसमोर पाण्याचे खाली मडके फोडले अधिकाऱ्यांना संपूर्ण घटनेची अवगत करून लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत करावा व नळद्वारे जलप्रवाह कमी झाल्यास टँकरने पाणीपुरवठा करावा अशी मागणी करण्यात आली. आंदोलनाला नीलिमा शास्त्री नलिनी सदावरती यांचे सहकार्य लाभले असून आंदोलनात महिला जिल्हाप्रमुख मनीषा पापडकर युवा सेना जिल्हाप्रमुख निलेश तिघरे, शहर प्रमुख धीरज फंदी युवा सेना शहर प्रमुख सलमान खान, राजू रेवतकर, राहुल पांडे, राम गर्गे, रुपेश ठाकरे, विनोद चकोर, उंबरेताई, निरंजन नाकाडे, किरण शेळके, विनोद चकोर, रूपाली लाखे, वर्षा येरजवार, अनिता डोंमळे, नेहा डोंमडे, मनीषा नागमोते, पटले, सोनाली उंमरे, शितल टिकले, रंजना राऊत, उज्वला शंभरकर, कमलाकर सावरकर, राजेंद्र गुरवे, बंडू बेले, सुधीर कोमलकर, प्रशांत फुलझेले, श्रीरंग साधू, दिव्यांशु दुर्गे, मिश्रा, वैदही भालेराव, वंदना पटले, शैलेश काशीकर, वैदही भालेराव, कमलेश राणावत संजय पटेल, रुपेश ठाकरे वर्षा वासनकर, विजया सोनकुसरे आकांक्षा काटोले, रिता डेकाटे यांच्यासह मोठ्या संख्येत शिवसैनिक हजर होते.

## लहुजी विद्यार्थी संघ वर्धाद्वारे करियर मार्गदर्शन शिबीर

**नागपूर :** स्थानिक वर्धा येथील डॉ. बाबासाहेब सामाजिक न्याय भवन वर्धा येथे लहुजी विद्यार्थी संघ वर्धा जिल्हा द्वारा आयोजित दहावी बारावी नंतर पुढे काय? कुठल्या शाखेत प्रवेश घ्यावा? आर्ट कॉमर्स की सायन्स की डिप्लोमा? विद्यार्थ्यांनी करियर कसे निवडावे यासाठी आम्ही आपल्यासाठी घेऊन आलोय, करियर मार्गदर्शन शिबिर, अशा मार्गदर्शन दिमागदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्रवीणजी वानखेडे निरीक्षण अधिकारी ता. चिमूर जी. चंद्रपूर, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गजाननजी सनेसर सहकार अधिकारी ता. कारंजा जि. वर्धा यांनी भूषविले, तर मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रा. मिलिंद घाटे करिअर कॉन्सिलर हिस्लॉप महाविद्यालय नागपूर, इंजिनिअर रवी खांडेकर कार्यकारी संचालक आर्यभट अकॅडमी नागपूर, ॲड. सचिन मेकाले संशोधक नागपूर विद्यापीठ, देवेन्द्र काटे मोटीवेशनल ट्रेनर, करिअर कॉन्सिलर नागपूर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते दिप प्रज्वलन तथा महामानवांचे प्रतिमेला हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रा. मिलिंद घाटे यांनी विविध शाखेतील डिग्री कोर्स डिप्लोमा व स्पर्धा परीक्षाबद्दल मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांनी आपले करियर कोणत्या क्षेत्रात




निवडायचे याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. इंजिनिअर रवी खांडेकर यांनी सायन्स फॅकल्टीमधून मेडिकल इंजिनिअरिंगला जाण्यासाठी, छश्र्श्व व हश्वश्ज्ञ चे प्रिपरेशन कसे करायचे ह्ष्ठ मध्ये जाण्याकरिता काय करायचे याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तर ॲड. सचिन मेकाले यांनी विद्यार्थ्यांना आपल्यातील सुप्त गुणांना ओळखून ज्या क्षेत्रात आपणास आवड व रुची असेल. त्याच क्षेत्रात उतुंग भरारी घेऊन, आपले भविष्य घडवावे व अपयशाला खचून न जाता आपले उद्दिष्ट व ध्येय गाठत पर्यंत प्रामाणिक पने वाटचाल करावी, असे विद्यार्थांना संबोधित केले. तर देवेन्द्र काटे यांनी, विद्यार्थ्यांच्या करियरमध्ये पालकांची काय भूमिका या बद्दल पालक वर्गांना मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमाचे माध्यमातून माधुरी गवई समाजकल्याण निरीक्षक अधिकारी जि. प. वर्धा, प्रणाली कांबळे पोलिस उपनिरीक्षक पदावर निवड झाल्याबद्दल, तर प्रफुल जाधव कर निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल, ॲड. अपर्णा तेलंगे उच्च न्यायालय नागपूर, सिमरन पोटफोडे स्टाफ नर्स तस्ष्ट यवतमाळ, या सर्वांचे पदोन्नतीकरिता निवड झाल्याबद्दल आयोजकांचे वतीने सत्कार करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. सर्वजित ताकतोडे तर आभार शेखर गवळी यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता व कार्यक्रमाचे आयोजन करिता प्रभाकर शिंदे यांचे मार्गदर्शन खाली, सुरेश चव्हाण, शेखर गवळी, सर्वजित ताकतोडे, अरुण पवार, सतीश गवळी, संजय तिळले पेंटर, पद्माकर बावणे, विनोद खंडारे, गजानन भेंडे, शरद बावने इत्यादींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला ज्येष्ठ समाज सेवक ॲड. महादेवराव तेलंगे, राजकुमार जाधव, गुलाबराव कळणे, अरुणराव निखाडे, राजेश चन्ने, प्रवीण डोंगरे, अशोक लोखंडे व इतर ज्येष्ठ मंडळींनी, विद्यार्थ्यांसोबत उपस्थिती दर्शविली व वर्धाजिल्ह्यातील बहुसंख्य विद्यार्थांनी, कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

## जाहीर सुचना

मी, भदन्त सिवनी बोधानंद, बुद्धभूमी महाविहार, कामठी रोड, नागपूर, आम जनतेस सुचित करण्यात येते की, श्री. निशांत चंद्रमणी मानवटकर यांचा महाबोधी टुरीझम, बुद्धभूमी महाविहार, कामठी रोड, खैरी, किंवा संबंधीत ट्रस्ट यांच्याशी कोणताही संबंध नाही व नव्हता. सदर व्यक्ती फक्त शिष्य म्हणून काही काळ बुद्धभूमी महाविहारशी संबंधीत होता. परंतू त्याने वैयक्तिक केलेले इतर लोकांशी आर्थिक व इतर व्यवहार संबंधीत इस्टला किंवा महाबोधी टूरिझम यांना बंधनकारक नाही व झालेल्या व्यवहाराशी काडीमात्र संबंध नाही व नव्हता. त्यामुळे आम जनतेस सुचित करण्यात येते की, महाबोधी टुरीझम किंवा बुद्धभूमी महाविहारच्या नावे कोणताही आर्थिक व्यवहार श्री. निशांत मानवटकर यांचेसोबत करु नये. केल्यास महाबोधी टुरीझम किंवा बुद्धभूमी महाविहार जबाबदार राहणार नाही. सदर व्यक्तीशी कोणताही संबंध नसल्याने त्याने केलेले आर्थिक व्यवहार बंधनकारक नसुन अशाप्रकारच्या झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबत भदन्त सिवनी बोधानंद यांचेशी संपर्क करु नये किंवा त्रास देवू नये. अन्यथा संबंधीत व्यक्तीवर बदनामी करण्याचे उद्देशाने केलेला प्रकार समजुन न्यायालयात दादा मागण्यात येईल. त्यास संबंधीत व्यक्ती जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

भदन्त सिवनी बोधानंद,
मो.9890237850, ७५५८५५२४८८.

## सामाजिक आणि मानसिक आरोग्यासाठी शिबिर आवश्यक : डॉ. अविनाश गावंडे



**नागपूर :** समाज भौतिक सुखाच्या आहारी गेला आहे. बदलत्या काळानुसार आयुष्य बदलत असून गरजा वाढत आहेत. यामुळे आयुष्यात जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली. प्रत्येक व्यक्ती स्वतःचे कर्तव्य विसरतो. मात्र आपल्यापेक्षा वरचढ समूहाच्या चुकांचे दोष दाखविण्यासाठी आघाडीवर असतो. यामुळे समाजात स्वार्थी प्रवृत्तीचा सुळसुळाट झाला आहे. तर दुसऱ्या बाजूचा विचार केल्यास शरीराच्या आरोग्यावर औषध उपलब्ध आहेत, परंतु सामाजिक आणि मानसिक द्वेषभावनेवर औषध नसल्याने त्याचे दुष्परिणाम दिसू लागले आहे. येणाऱ्या काळात सामाजिक आणि मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी जात-धर्म-पंथ-संप्रदायापलीकडचे संस्कार मुलांच्या मनावर घडविणे आवश्यक आहे, यासाठी मुलांसाठी संस्कार शिबिरांची गरज आहे, त्याच धर्तीवर पालकांसाठी शिबिरांची गरज निर्माण झाली आहे, असे मत मेडिकलचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. अविनाश गावंडे यांनी व्यक्त केले.

कर्मश्री दुर्गादास रक्षक यांच्या स्मृतिला समर्पित शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी येरला येथील श्री गुरूदेव मानव मंदिर रक्षक बागेत निवासी सुसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराच्या समारोपीय सोहळ्यात पालक आणि शिबीरार्थीना संबोधित करताना मेडिकलचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. अविनाश गावंडे बोलत होते. दै.सकाळच्या विदर्भ आवृत्तीचे निवासी संपादक प्रमोद काळबांडे यांच्यासह शिबिर संयोजक ज्ञानेश्वर रक्षक यांनी विचार व्यक्त केले. सकाळचे निवासी संपादक प्रमोद काळबांडे म्हणाले, आजही भारताकडे बघताना खेड्यातील आणि शहरातील भारत नजरेत पडतो. तसेच गरीब आणि श्रीमंत अशी दरी दिसते. आजही वंचित घटकांपासून मानवीमुल्य दूर दिसतात. संयुक्त कुटुंब व्यवस्था इतिहास जमा झाली आहे. कुटुंब लहान तसेच मर्यादीत झाली, यामुळे मुलांचे अति लाड वाढले. मुलांनी मागितलेल्या गोष्टी त्यांना सहज मिळतात. आई-वडीलांच्या श्रमाची जाणीव मुलांमध्ये दिसत नाही. यामुळे मुले हट्टी होतात, त्यांचे अति लाड नको तर चागंले काम केल्यास त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्या. शिक्षणासोबतच विविध क्षेत्रात त्यांना सिद्ध करण्याची संधी मिळवून द्या, यासाठी अशा सुसंस्कार शिबिरांची गरज आहे. शिबीरात भन्ते संघरत्न माणके, डॉ. अन्वर सिद्धकी, दिनबंधू संस्थेचे नितीन सरदार, दिव्यांग खेळाडू इस्थर कुजूर, पुष्पा रक्षक यांनी शिबीरार्थीशी संवाद साधला. शिबीराच्या समारोपीय सोहळ्यात प्रशांत हाडके, रामजी जोगराना, वैशाली काळबांडे उपस्थित होते. शिबिराचे प्रशिक्षक म्हणून छाया मानव, मुकेश कोल्हे, तुलसीदास झुंजुरकर, प्रज्वल टोंगे यांनी सेवा दिली. यावेळी शिबीरातील मुलामुलींच्या कलागुणांचे सादरीकरण झाले. आदर्श विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करून राष्ट्रसंत लिखित राष्ट्रवंदनेने शिबीराचा समारोप करण्यात आला.


## जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451


बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648